आवृत्ती – अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक १२४ | शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६ | पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 | www.rashtrasahyadri.com

## १०० वर्षाची जिल्हा परिषद शाळाच विकली!




**नाशिक :** निफाड तालुक्यातील विंचूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असलेली गट नं. ६२७ जागा बनावट कागदपत्रांच्या आधारे परस्पर विक्री करण्यात आल्याने तणाव निर्माण झाला आहे. गुजरात राज्यात तयार केलेल्या मुक्तारपत्राच्या माध्यमातून विंचूर येथील शाळेची बनावट कागदपत्रांच्या आधारे विक्री झाल्याची तक्रार करण्यात आली आहे. यामुळे शाळेचे विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आक्रमक झाले. नाशिक–छत्रपती संभाजीनगर मार्गावर आंदोलन करण्यात आले. घोषणांबाजी करुन परिसर दणाणून सोडण्यात आला. संबंधित व्यवहाराची नोंद रद्द होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

## महत्त्वाचे..

### कर्जवसुलीसाठी येणाऱ्या रिकव्हरी एजंटला बसणार चाप

मुंबई : वित्तीय प्रणालीतील कर्जवसुली प्रतिनिधींसाठी (रिकव्हरी एजंट) रिझर्व्ह बँकेने कठोर नियमावली प्रस्तावित केली आहे.

जबाबदार वर्तनाची अपेक्षा ठेवणाऱ्या या नियमांत, ग्राहकांच्या व्यक्तिगत माहितीच्या गैरवापरास मनाई, मानसिक छळाला प्रतिबंध आणि त्यांच्याशी होणाऱ्या दूरध्वनी संभाषणाचे रेकॉर्डिंग बंधनकारक करण्यात येईल. बहुतांश प्रसंगी 'थर्ड-पार्टी' किंवा 'त्रयस्थ' संस्थांकडे कर्जवसुलीचे काम सोपविले जाते, या वसुली प्रतिनिधींची असभ्य भाषा, गैरवर्तन अथवा अनैतिक पद्धतींबाबत तक्रारी प्रचंड वाढल्या असून त्यांना पायबंद म्हणून प्रस्तावित हे नवीन नियम बँका, बँकेतर वित्तीय कंपन्या (एनबीएफसी) आणि स्मॉल फायनान्स बँका अशा सर्व वित्तीय संस्थांना लागू असतील.

### झापुक | zupuk

आजकाल राजकारणात
होऊ लागली जाती
धर्माच्या वाटाबाटी
सत्तेसाठी करू
लागली घरा घराची
काटाकाटी

नवनाथ कुताळ
९४२२२३१८२५

# हॉस्पिटलमध्ये बेछूट गोळीबार

## टोळीयुद्धाने घोडेगाव, अहिल्यानगर हादरले

### लागोपाठ दोन गोळीबाराच्या घटना; नितीन शिरसाठचा मृत्यू; फुलमाळी जखमी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे गुरुवारी (१२ फेब्रुवारी) संध्याकाळी गोळीबाराची घटना घडली. जनावरांच्या बाजारातील वाहन ठेक्यावरून उद्धवलेल्या टोळीयुद्धातून हा गोळीबार झाला. गोळीबारात जखमी झालेल्या नितीन शिरसाठ यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलवले. मात्र हल्लेखोरांनी पुन्हा तेथेही गोळीबार केला. त्यात नितीन शिरसाठ याचा जागीच मृत्यू झाला तर विरुद्ध बाजूचा संजय फुलमाळी असे जखमीचे नाव आहे. संजय फुलमाळी याला अधिक उपचारासाठी पुण्याला हलवण्यात आले आहे.

गुरुवारी संध्याकाळी सुमारे ५:३० वाजता घोडेगाव येथील घोरपडे हॉस्पिटलमध्ये ही गोळीबाराची घटना घडली. नितीन शिरसाठ आपल्या पत्नीच्या उपचारासाठी कुटुंबासह घोरपडे हॉस्पिटलमध्ये आले होते. त्यावेळी शिरसाठ व गुलाब फुलमाळी या दोघांचे समर्थक एकमेकांसमोर आले व त्यांनी परस्परांवर गावठी कट्ट्यातून गोळीबार केला. शिरसाठ यांच्यावरही गावठी कट्ट्यातून बेछूट गोळीबार केला. ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने अहिल्यानगर (नगर) येथील खासगी दवाखान्यात हलवले. तेथेही आरोपींनी पुन्हा गोळीबार केला आणि नितीन शिरसाठ यांचा जागीच मृत्यू झाला.

या गोळीबारात दुसरा एक व्यक्ती (फुलमाळी) गंभीर जखमी झाला. त्याला पुढील उपचारासाठी पुण्यात हलवण्यात आले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी), नेवासा, सोनई, शनिशिंगणापूर आणि शेवगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तपासासाठी दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. नितीन शिरसाठ याचा अहिल्यानगरमधील खाजगी रुग्णालयात मृत्यू झाला. याच रुग्णालयात जखमी सुरज फुलमाळी याला उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, नंतर अधिक उपचारासाठी पुण्याला हलवण्यात आले आहे. दरम्यान पोलिसांनी या घटने संदर्भात दोघांना ताब्यात घेतली आहे.

### अहिल्यानगरही शहरात गोळीबार

**अहिल्यानगर शहरात कोठला परिसरात बुधवारी मध्यरात्री ११.३० च्या सुमारास झालेल्या गोळीबारामध्ये अबरार मुख्तार शेख (वय २४, रा. प्रबुद्धनगर, आलमगीर, भिंगार) जखमी झाला. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. एकास ताब्यात घेण्यात आले आहे.**

## राष्ट्रवादी विलीनीकरणाबाबत अजितदादांची स्पष्ट बोलणे झाले होते : खा. सुप्रिया सुळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** माझं आणि माझ्या दादामध्ये विलिनीकरणावर चर्चा झाली होती. आमचं जे बोलणं झालं होतं ते अजितदादांना माहीत होतं, बहिण-भावामध्ये बोलणं झालं होतं ते आमच्यात आहे आणि ते वास्तव असल्याचे खा. सुप्रिया सुळे म्हणाल्या. अनेकांना विलिनीकरणाबाबत बऱ्याच गोष्टी माहीत आहेत. मात्र अनेकांना मी बोललेले आवडत नाही, असा टोला त्यांनी विलीनीकरणाला विरोध करणाऱ्या अजित पवार गटातील नेत्यांना लागवला.

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी चौकशीचा शब्द दिला



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल शब्द दिला आहे की, या सगळ्याची ते चौकशी करतील. रोहित पवारांची अस्वस्थता सहाजिक आहे. त्याने अतिशय पारदर्शकपणे प्रश्न मांडले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ते या सगळ्या प्रश्नांची सविस्तर माहिती घेऊन, पारदर्शक चौकशी करतील. त्यामुळे या चौकशीची वाट पाहू, असे सुप्रिया सुळेंनी सांगितले. तसेच रोहित पवारांच्या पत्रकार परिषदेत पूर्व विदर्भातल्या नेत्याचे नाव घेतले आहे. मात्र त्याबद्दल मला माहिती नाही, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.**

सुप्रिया सुळेंनी गुरुवारी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, मी आणि सुनेत्रा वहिनी यापुर्वीही डीपीडीसीला एकत्र होतो. सुनेत्रा वहिनींवर ही नवीन जबाबदारी आहे. एका डोळ्यात अश्रू आणि एका डोळ्यात आनंद आहे. सुनेत्रा वहिनी पालकमंत्री झाल्याचा आनंद आहे. मात्र अजितदादा नसल्याचं दुःखही आहे. अजितदादा नसण्याचं दुःख कधीच भरून निघणार नाही. आजही खरं वाटत नाही की अजितदादा आपल्यात नाही. आमचं कुटुंब सध्या अडचणीतून जात आहे.

शरद पवारांची तब्येत खूप चांगली आहे. रूबी हॉल रूग्णालयाच्या स्टाफचे मी आभार मानते. शरद पवारांना उद्या रुग्णालायातून डिस्चार्ज मिळू शकतो. शरद पवार जेव्हा हॉस्पिटलमधे होते तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तब्येतीची विचारपूस करण्यासाठी फोन केले होते. अजितदादानंतरच्या काळातही या सगळ्यांनी आमची साथ दिली त्याबद्दलही मी सगळ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांचे आभार मानते, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## नराधम शिक्षकाला न्यायालयाच्या आवारातच महिलांनी चोपले



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील नामांकित मराठी शाळेतील इयत्ता दुसरीच्या चार चिमुकल्या विद्यार्थ्यांनीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपी शिक्षकाला श्रीरामपूर न्यायालयाच्या आवारात संतप्त महिलांनी हल्ला करत बेदम मारहाण केली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत त्याची सुटका केली.

सचिन गोणारकर असे या शिक्षकाचे नाव आहे. शहरातील नामांकित मराठी शाळेतील इयत्ता दुसरीच्या चार चिमुकल्या विद्यार्थ्यांनीवर लैंगिक अत्याचार केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. आरोपी शिक्षकाला गुरुवारी श्रीरामपूर न्यायालयात हजर करण्यासाठी आणत असताना न्यायालयाच्या आवारात संतप्त महिलांनी हल्ला केला. नराधम शिक्षकाला या महिलांनी बेदम मारहाण करत चांगलाच चोप दिला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने या नराधम शिक्षकाची संतप्त महिलांच्या तावडीतून सुटका झाली. पोलीस कोठडीत असलेल्या शिक्षक सचिन गोणारकर याला आज दि.१२ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी न्यायालयासमोर हजर केले होते. दरम्यान या घटनेमुळे न्यायालयाच्या आवारात काही काळ गोंधळ निर्माण होवुन तणावपूर्ण वातावरण झाले होते. दरम्यान चिमुकल्या मुलींवर झालेल्या या अत्याचाराच्या घटनेने पालक वर्गात संतापाचे वातावरण आहे.

तसेच आता शाळेतही मुली सुरक्षित नसल्याने पालक चिंता व्यक्त करत असून या घटनेतील नराधम आरोपी शिक्षकाला कठोर शिक्षा करावी, अशी मागणी केली जात आहे.

## प्रवास सवलतीसाठी स्मार्टकार्ड बंधनकारक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध योजनांतील सवलतधारक किंवा योजनेअंतर्गत प्रवासाचा लाभ घेण्यासाठी यापुढे 'स्मार्ट कार्ड' बंधनकारक करण्यात येणार आहे. एसटी महामंडळाने व्यवहारात पारदर्शकता यावी आणि प्रवाशांना सुलभ सेवा मिळावी म्हणून 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) या डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीचा अवलंब करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून नुकताच ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला आहे.

एसटी महामंडळांतर्गत महिला सन्मान योजनेअंतर्गत महिलांना ५० टक्के सवलत, ६५ ते ७५ वयोगटातील प्रवाशांसाठी ५० टक्के सवलत, ७५ वर्षांपेक्षा पुढील ज्येष्ठांसाठी अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत विनाशुल्क प्रवास, शालेय विद्यार्थ्यांसाठी ६६.६७ टक्के दरात मासिक पास योजना, बारावीपर्यंत मुलींना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत मोफत पास, एनसीएमसी कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे.

## खडीने भरलेल्या डंपरने शाळकरी मुलाला चिरडले



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** पुणे - नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील सायखिंडी फाट्यावर भरधाव वेगात धावणाऱ्या खडीने भरलेल्या डंपरने समाधान विश्वनाथ मोहिते (वय १२) याला चिरडले. या भीषण अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला.

शाळा सुटल्यावर मित्रांसोबत घरी परतत असताना समाधानला एका विना नंबरच्या अनाधिकृतपणे ओव्हर लोड खडी वाहून नेणाऱ्या दहा टायर डंपरने चिरडले. यात त्याचा जागीच मृत्यू झाला तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कारवाई झाली नाही, तर पोलीस ठाण्यासमोरच अंत्यविधी करू, असा कडक इशारा ही समाधानच्या नातेवाईकांनी पोलीस प्रशासनाला दिला होता. त्यानंतर संगमनेर तालुका पोलिसांनी या प्रकरणी नातेवाईक पवन काशीद यांनी तालुका पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी डंपर चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहे

अपघातात मयत झालेला समाधान (मूळ रा. मुथाळणे ता. अकोले ह. रा. चिकणी ता. संगमनेर) हा शिक्षणासाठी आपल्या मामाकडे (पवार) आला होता.

**अपघातानंतर संतप्त झालेल्या समाधानच्या नातेवाईकांनी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन सुरू केले. संबंधित डंपर व त्याचा चालक आणि मालक यांना ताब्यात घेतल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा आंदोलकांनी घेतला.**

दहा वर्षांपूर्वी त्याच्या वडिलांचे निधन झाले असून त्याचे मूळ गाव अकोले तालुक्यातील नायकरवाडी मुथाळणे) आहे. आई संगीता ही मोलमजुरी करूनकुटुंबाचा उदरनिर्वाह चालवते समाधानचा. २४ तारखेला वाढदिवस होता; मात्र वाढदिवसा आधीच त्याच्यावरती नियतीने घाला घातला. अल्पवयात आयुष्य संपल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या फसवणुकीचा तपास केंद्रीय संस्थांमार्फत करा!

### खा. नीलेश लंके यांनी घेतली केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या फसवणूक प्रकरणाचा तपास ईडी, सीबीआय यासारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय द्यावा तसेच भविष्यात अशा फसव्या योजनांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीमध्ये भेट घेऊन केली आहे.



खासदार लंके यांनी यापूर्वी पंतप्रधानांच्या भेटीत त्यांना रायगड किल्ल्याच्या भेटीचे निमंत्रण दिले होते. आता गृहमंत्री शहा यांची भेट घेऊन गुंतवणूकदारांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत जिल्ह्यातील गुंतवणूकदारांचा प्रश्न प्रचाराचा बनला होता. याच मुद्द्यावरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे व त्यांचे चिरंजीव माजी खासदार सुजय विखे यांनी खासदार लंके यांचे नाव न घेता त्यांच्याविरुद्ध टीकेची झोड उठवली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महापालिकेच्या निवडणूक प्रचार सभेत गुंतवणूकदारांच्या फसवणुकीचा तपास सीबीआयकडे सोपवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे जाहीर केले होते. खासदार लंके यांनी यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री शहा यांना निवेदन दिले. राज्यात **(पान ४ वर)**

## १५ फेब्रुवारीपर्यंत शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाची माहिती द्या

### राज्य शासनाचे बँकांना आदेश: कर्जमाफीच्या हालचालींना वेग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीच्या योजनेला वेग दिला जात असून सर्व बँकांनी शेतकऱ्यांच्या थकित कर्जाची माहिती १५ फेब्रुवारी पर्यंत भरावी अशा सूचना सर्व राष्ट्रीय व अग्रणी बँकांना देण्यात आल्या आहेत.

३० जून २०२५ या तारखेला गृहीत धरुन कर्जमाफीच्या हालचाली सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. कर्जमाफी होणार असल्याने शेती कर्ज भरण्यास कोणी पुढाकार घेत नव्हते. साधारणतः ५५ हजार कोटी रुपयांपर्यंत शेती कर्ज थकित असले तरी त्यातील थकित पीक कर्जाचा आकडा तातडीने सांगता येणार नाही, असे बँक अधिकारी सांगतात.

## बाल, युवा आणि महिलांसाठी स्वतंत्र संमेलने; प्रत्येक संमेलनाला ५ कोटींचा निधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मराठी भाषेला गेल्या वर्षी अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकारने मराठी भाषा संवर्धसाठी काही उपक्रम व योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. उपक्रमांच्या या प्रयत्नात आता राज्यात दरवर्षी विभाग निहाय बाल, युवा, आणि महिलांसाठी चक्राकार पध्दतीने स्वतंत्र संमेलने आयोजित केली जाणार आहेत.

त्यासाठी प्रत्येक संमेलनाला पाच कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले. राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने या सर्व संमेलनांचे आयोजन करण्यात येणार आहे.



राज्य सरकारने दोन वर्षापूर्वी मार्च महिन्यात मराठी भाषा धोरण जाहीर केले आहे. ऑक्टोबर महिन्यात केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा जाहीर केला. सरकारने मराठी भाषा धोरणानुसार ३६ जिल्ह्यात साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या वतीने पाच लाख रुपये अर्थसहाय्य देण्याचे जाहीर केले आहे. राज्यातील बाल, महिला, आणि तरुणांमध्ये मराठी भाषेची रुची व जिज्ञासा निर्माण करण्यासाठी आता स्वतंत्र संमेलने आयोजित केली जाणार आहेत. या निमित्ताने मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. १५ ते ३० वयोगटातील तरुणांना मराठी भाषेच्या माध्यमातून कोणते रोजगार उपलब्ध होऊ शकतील यांची माहिती दिली जाणार आहे.युवकांना आर्कषित करणारा विषय या संमेलनात निवडण्यात यावा असे सुचविण्यात आले आहे. तरुणांच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्याचे काम या संमेलनातून व्हावे असे अभिप्रेत आहे. महिलांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या संमेलनात महिलांच्या सर्वांगिण विकासाठी विविध क्षेत्रातील संधी उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. राज्यातील अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी या महिला शक्तीचा उपयोग करुन घेतला जावा हा या संमेलन आयोजनामागील उद्देश आहे.

### संमेलनातून मराठी भाषेचे सहज शिक्षण

**बारा वर्षाखालील मुलांसाठी बाल संमेलन आयोजित केले जाणार आहे. संमेलनातील मुलांच्या सहभागातून मराठी भाषेविषयी सहज शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मराठीतील गंमतीदार म्हणी, वाक्यप्रचारांची ओळख, शब्दकोडे, अशा प्रकारचे कल्पक खेळांचे आयोजन या संमेलनात केले जाईल. संमेलनाचे ठिकाण हे मुलांसाठी सोयीचे आणि आर्कषक असावे अशी अट आहे. या संमेलनात बालमानसशास्त्रज्ञ तसेच बाल साहित्यिक यांना आमंत्रित केले जाणार आहे.**

## संपादकीय

# बालिकांच्या अश्रूंना न्याय कधी?

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील हिंदसेवा मंडळाच्या एका नामांकित शाळेत इयत्ता दुसरीच्या चार चिमुकल्या मुलींवर वर्गशिक्षकाने लैंगिक अत्याचार केला. बोबड्या आवाजात, भेदरलेल्या डोळ्यांनी त्या आई-वडिलांना सांगतात, तेव्हा समाजाच्या छातीवर चरक बसतो. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संबंधिताने प्रारंभी दडपण्याचा प्रयत्न केला. त्याच संस्थेच्या दुसऱ्या शाळेत एका माजी विद्यार्थिनीने शिक्षकाच्या घरी आत्महत्या केली; कारण सर्वश्रुत असताना त्यातही संबंधितांनी पांघरूण घालण्याचा डाव रचला. यापेक्षा समाजाची नैतिकता अधिक खालावलेली दुसरी कुठली उदाहरणे द्यायची?

ही घटना श्रीरामपूरपुरती मर्यादित नाही. काही महिन्यांपूर्वी ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील शाळेत दोन चार वर्षांच्या चिमुकल्यांवर शाळेतील कर्मचाऱ्याने अत्याचार केला. तेव्हा जनतेच्या संतापाला सामोरे जाताना शासनाने सीसीटीव्ही बंधनकारक केले, लहान मुलांच्या वर्गात महिला शिक्षक नेमण्याची चर्चा केली, विशाखा समित्या स्थापन करण्याचे आदेश दिले. पण आजही अशा घटना थांबलेल्या नाहीत. नाशिकच्या इगतपुरीत ५५ वर्षीय शिक्षकाने नऊ वर्षांच्या मुलीवर आठ महिने अत्याचार केला. नांदेडमध्ये सात वर्षांच्या चिमुकलीवर शिक्षकाने बलात्कार केला. कोल्हापूर, यवतमाळ, अकोला – राज्यभर शिक्षण क्षेत्रातूनच असे हैवान कृत्य समोर येत आहेत. यातून स्पष्ट होते की, नियम कागदोपत्री राहिले तर ते फोल ठरतात.

श्रीरामपूर प्रकरणात आरोपी शिक्षक सचिन गोणारकर याला अटक झाली. न्यायालयात नेताना संतप्त महिलांनी त्याच्यावर हल्ला केला. पोलिसांनी त्याला वाचवले. ही घटना जनभावनेची झलक आहे. पण पोलिसांनी प्रारंभी सतर्क राहिले असते तर असे संताप उसळले नसते. शाळेने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला, हे खेदजनक आहे. हिंदसेवा मंडळासारख्या प्रतिष्ठित संस्थेने बालकांच्या सुरक्षेचे पावित्र्य राखले असते तर हे घडले नसते. शिक्षण हे पवित्र क्षेत्र आहे, पण आज ते भ्रष्टाचार, लैंगिक शोषण आणि दडपशाहीचे केंद्र बनले आहे.

शिक्षक हा गुरू मानला जातो. तो बालकांना ज्ञान, संस्कार आणि मूल्ये शिकवतो. पण जेव्हा तोच नराधम बनतो, तेव्हा समाजाच्या पायाखालची जमीन सरकते. श्रीरामपूरमध्ये चार चिमुकल्या – ज्या अद्याप 'आई' म्हणतात, खेळतात, निरागस हसतात – त्यांच्यावर अयोग्य स्पर्श, विनयभंग यातून समाजाची खालावलेली नैतिकता दिसते. हिंदू संस्कृतीच्या नावाने चालणाऱ्या संस्था बालिकांच्या रक्षणात अपयशी ठरतात, हे दुर्दैवी आहे.

महाराष्ट्रात अशा घटनांची यादी लांब आहे. २०२४ मध्ये बदलापूर प्रकरणाने राज्य हादरले. दोन चिमुकल्यांवर अत्याचार, शाळेने दडपले, सीसीटीव्ही फुटेज गायब. उच्च न्यायालयाने तीव्र टीका केली. शासनाने सीसीटीव्ही अनिवार्य केले, पण आजही अनेक शाळांमध्ये ते कार्यरत नाहीत किंवा फक्त 'डिस्प्ले'साठी आहेत. २०२५-२६ मध्ये नाशिक, नांदेड, कोल्हापूर येथील प्रकरणे समोर आली. प्रत्येक वेळी 'एकच खळबळ, एकच निंदा, एकच आश्वासने' आणि मग विस्मरण. ही चक्रव्यूहात अडकलेली परिस्थिती आहे.

पोलिसांनी सतर्क राहिले पाहिजे. पोक्सो कायद्याची अंमलबजावणी तातडीने व्हायला हवी. आरोपीला अटक झालीच पाहिजे, पण शाळा व्यवस्थापनाने दडपले तर त्यांच्यावरही गुन्हा दाखल व्हावा. बालक हक्क संरक्षण आयोगाने सक्रिय भूमिका घ्यायला हवी. जिल्हा शिक्षण अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमित निरीक्षण करावे. पण प्रत्यक्षात हे सर्व कागदोपत्रीच राहते.

आता फक्त चर्चा पुरेशी नाही. कठोर पावले उचलायला हवीत. प्रत्येक शाळेत वर्ग, गल्ली, शौचालयाबाहेर, खेळाच्या मैदानावर सीसीटीव्ही. फुटेज ९० दिवस साठवणे अनिवार्य करायला हवे. दर महिन्याला जिल्हा पातळीवर त्याची तपासणी करावी. नादुरुस्त असल्यास शाळेचे लायसन्स रद्द करावे. इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत सर्व वर्गात महिला शिक्षक अनिवार्य करायला हवे. पुरुष शिक्षक असतील तर त्यांच्या वर्गात महिला सहाय्यक किंवा पर्यवेक्षक नेमावेत. सर्व शिक्षक, कर्मचारी, ड्रायव्हर, शिपाई यांची पार्श्वभूमी तपासणी अनिवार्य करून प्रत्येकाचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घ्यायला पाहिजे. पूर्वी पोक्सो प्रकरण असलेल्यांना कधीही शाळेत प्रवेश देऊ नये. प्रत्येक शाळेत 'चाइल्ड प्रोटेक्शन कमिटी' – पालक, शिक्षक, स्थानिक नागरिक, पोलीस प्रतिनिधी नेमावे. दर तीन महिन्यांनी त्यांची बैठक होऊन आढावा घेतला गेला पाहिजे. बाल लैंगिक शोषण ओळखणे, रिपोर्टिंग, कौन्सेलिंग यावर अनिवार्य प्रशिक्षण द्यावे. रिपोर्ट न केल्यास शिक्षकावर गुन्हा दाखल करायला मागेपुढे पाहू नये.

शाळा व्यवस्थापनाने प्रकरण दडपल्यास मुख्याध्यापक, ट्रस्ट अध्यक्ष यांना पोक्सो अंतर्गत सह-आरोपी करून लायसन्स रद्द, आर्थिक दंड करावा, जेणेकरून इतरांना धडा मिळेल. पीडितांची तातडीने वैद्यकीय तपासणी, मानसिक कौन्सेलिंग, न्यायिक प्रक्रिया वेगवान करायला हवी. पीडित कुटुंबाला आर्थिक मदत आणि पुनर्वसन ही प्रक्रिया कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष प्रभावी राबवायला हवी.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे पालक जागृती. पालकांनी मुलांशी खुल्या मनाने बोलावे. शाळेत सीसीटीव्ही फुटेज मागण्याचा अधिकार आहे. संशय असल्यास थेट पोलीस किंवा बाल आयोगाकडे संपर्क करायला पाहिजे. माध्यमांनी सतत पाठपुरावा करावा, समाजाने 'शिक्षक म्हणजे देव' या भ्रमातून बाहेर यावे. दोषी कोणीही असो, शिक्षा व्हायला हवी. समाज जागा होही फक्त बातमी नाही, ही चेतावणी आहे. आपल्या मुली शाळेत पाठवतो, पण ती सुरक्षित आहे का? शिक्षण मंदिरे भ्रष्टाचाराच्या गर्तेत बुडाली आहेत. हिंदसेवा मंडळासारख्या संस्थांनी आत्मपरीक्षण करावे. शासनाने केवळ ग्रामोफोन रेकॉर्डसारखे नियम काढून चालणार नाही; अंमलबजावणी करावी. पोलिसांनी सतर्क राहावे, अन्यथा जनता रस्त्यावर उतरेल.

चार चिमुकल्या, बदलापूरच्या दोन, इगतपुरीची एक, नांदेडची एक – या सर्वांच्या अश्रूंना न्याय मिळाला पाहिजे. दोषी शिक्षक, मुख्याध्यापक, ट्रस्ट अधिकारी – कोणीही सुटता कामा नये. शून्य सहनशीलता हवी. बालिका सुरक्षित झाल्या तरच शिक्षण क्षेत्र पवित्र राहील. समाज जागा हो. पालक उठा. शासन जागे हो. अन्यथा उद्या आपली मुलगी, आपली बहिण याच गर्तेत सापडेल. न्याय मिळो, सुरक्षा मिळो, नैतिकता पुनर्स्थापित होवो, हीच नागरिकांची संविधानिक मागणी..!

# कष्टकरी महिलांचे केंद्रच्या धोरणाविरोधात निदर्शने
## तहसील व पोलीस प्रशासनाला निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील विविध क्षेत्रातील कामगार कष्टकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाच्या वतीने केंद्र शासनाच्या धोरणा विरुद्ध निदर्शने करण्यात आली. संघांचे अध्यक्ष बाळासाहेब सुरुडे, शरद संसारे यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. मोर्चाचे निवेदन निवासी नायब तहसीलदार संध्या दळवी व पोलीस उप निरीक्षक नितीन सप्तर्षी यांनी स्वीकारले. मोर्चास कामगार, सेविका, मदतनीस, शेतकरी शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना बाळासाहेब सुरुडे यांनी सांगितले की, केंद्र शासनाने २९ कायद्याचे चार श्रम कायद्यात रूपांतर केले. त्यामुळे देशातील कामगार कष्टकऱ्यांना न्याय हक्का पासून वंचित ठेवून कंत्राटी पद्धतीला खत पाणी दिले आहे. कुठलेही क्षेत्रात कायम नोकरी नसल्यामुळे पेन्शन ग्रॅच्युटी मिळणे दुरापास्त झाले आहे. कंत्राटी पद्धतीमुळे न्यायालयात जाण्याचा हक्कही हिरावून घेतला असून यापुढे ८ तासा ऐवजी १२ तासाचा




दिवस धरणार आहेत. स्त्री कामगारांना रात्रपाळीत काम करावे लागेल. यामुळे महिला कामगारांवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच प्रचंड बेरोजगारी वाढ होतं आहे. या विरुद्ध एकाजुटीने संघर्ष करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शरद संसारे यांनी सांगितले की, एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत काम करणाऱ्या सेविका मदतनीस यांना जाणूनबुजून वेतन, पेन्शन, ग्रॅच्युटी व सुट्टी आदींचा लाभ दिला जात नाही. वर्षानुवर्षा सेवा देऊन पण त्यांना कायम कामगार संज्ञेत घेत नाहीत. सेविकांना योजना बाह्य कामे देऊन कमी मानधनात जास्त काम घायचे. यातून शासनाची महिला बाबतची असलेली भूमिका स्पष्ट होते. शेतकऱ्यांच्या शेत मालाला उत्पन्नावर आधारित किंमत देणे ऐवजी बाहेरून शेत माल आयात करून येथील किंमती नियत्रीत करतात. हे सरकार कामगार, शेतकरी विरुद्ध असून अदानी अंबानी यांना पायघड्या घालत आहे. हा सरकारचा खरा चेहरा आहे, हे ओळखले पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी मिठू शेख, आश्रू बर्डे, मालन माळी, सुमन कवाने, सुनिता धसाळ, भागीरथी पवार, सुनिता साळवे, शोभा पटेकर, अर्चना कुलकर्णी, ज्ञानेश्वर जाधव, रमेश डुकरे, सुनील ठाकर, बाबुलाल पठाण, किशोर वाघ, जालिंदर माळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# कामगार रुग्णालयास मंजुरी;कामगार संघटनेने मानले आ. खताळ यांचे आभार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर:** तालुक्यातील कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, आमदार अमोल खताळ यांनी सातत्यपूर्ण केलेल्या पाठपुराव्यामुळे येथे कामगार रुग्णालयास राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना सुलभ, परवडणारी आणि तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.म

औद्योगिक व इतर क्षेत्रांत कार्यरत असलेल्या कामगारांची संख्या मोठी आहे. मात्र, त्यांच्यासाठी स्वतंत्र व सुसज्ज आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. गंभीर आजार, अपघात किंवा तातडीच्या



उपचारांसाठी दूरच्या ठिकाणी जावे लागत असल्याने वेळ आणि खर्च दोन्ही वाढत होते. ही बाब लक्षात घेऊन आमदार खताळ यांनी राज्य शासनाकडे वारंवार पाठपुरावा करत कामगार रुग्णालयाची मागणी लावून धरली होती.या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आता संगमनेर येथे कामगार रुग्णालय सुरू होणार असून, त्यामध्ये कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या रुग्णालयामुळे कामगारांना सुलभ, परवडणाऱ्या व तातडीच्या आरोग्यसेवा मिळणार.असल्याने त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होणार आहे. कामगारांच्या जीवन-मरणाशी संबंधित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याबद्दल संगमनेर तालुका तंबाखू जादा कामगार संघटनेच्या वतीने आमदार अमोल खताळ यांचे आभार मानण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष माधव नेहे, चिटणीस ज्ञानेश्वर सहाने, सदस्य बाळासाहेब पवार मुकेश काठे अर्जुन अरगडे भारत नाटे चंद्रकांत आव्हाड अजित मिसाळ यांनी आ. खताळ यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले.

# विवेक कोल्हे यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची विविध प्रश्नांबाबत भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालय येथे युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी सदिच्छा भेट घेत कोपरगाव शहर व मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासंदर्भातील विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा केली.या भेटीदरम्यान धोत्रे, नाथगंगा, बापतरे, पुरणगाव आदी परिसरातील सुमारे ५००० एकर क्षेत्रावर प्रस्तावित असलेला आणि २०१९ पासून प्रलंबित असलेला स्मार्ट सिटी प्रकल्पासह संबंधित शेतकरी बांधवांच्या चार प्रमुख मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय झाल्यास तातडीने करारनामे प्रक्रिया सुरू होऊन विकासकामांना गती मिळणार असल्याचे विवेकभैय्या कोल्हे यांनी नमूद केले. या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांशी अत्यंत सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोपरगावच्या विकासात्मक प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहत आवश्यक ते मार्गदर्शन केले व विकासकामे मार्गी लावण्यासाठी सकारात्मक भूमिका व्यक्त केली. शासन व स्थानिक पातळीवरील समन्वय अधिक बळकट करून कोपरगावच्या प्रगतीला नवी दिशा देण्याचा निर्धार या भेटीतून अधोरेखित झाला.



# हनुमान गावाचे खरे रक्षक : निवृत्ती महाराज देशमुख

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**आश्वी | प्रतिनिधी**

हनुमंत राया हा गावाचा आणि देवाचा रक्षणकर्ता आहे. प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रालाही अहिरावण-महिरावणाच्या तावडीतून हनुमानानेच वाचवले होते. त्यामुळेच श्री रामचंद्राचे खरे आणि सर्वात आवडते भक्त म्हणून हनुमान नावारूपास आले, असे प्रतिपादन निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील श्री क्षेत्र उंबरी बाळापूर येथे आयोजित श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन सेवेत इंदुरीकर महाराज बोलत होते. या धार्मिक



सोहळ्याची नुकतीच महाप्रसादाने सांगता झाली.

गावामध्ये गेल्या तीन दिवसांपासून हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात मूर्तीची भव्य आणि दिव्य मिरवणूक, पूजा-अर्चा, विधिवत होम-हवन आणि महाआरती आदी कार्यक्रमांचा समावेश होता. या सर्व धार्मिक विधींचे पौरोहित्य गुरू महेश सांबरे आणि त्र्यंबकेश्वर येथून आलेल्या ब्रह्मवृंदांनी अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने पार पाडले.

या सोहळ्यात श्री हनुमान मूर्तीची प्राणप्रतिष्ठा वरवंडीचे मठाधिपती महंत दत्तगिरी महाराज यांच्या हस्ते आणि मंत्रोच्चारांच्या गजरात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या धार्मिक सोहळ्यात विधिवत पूजेसाठी गावातील ११ जोडप्यांनी सहभाग नोंदवला. सर्व धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# लग्नात पर्यावरणपूरक उपक्रम पाहुण्यांना आंबा रोपे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** खळी येथील प्रगतशील शेतकरी बाळासाहेब चौधरी यांच्या कुटुंबाने विवाह सोहळ्याला सामाजिक आणि पर्यावरणपूरक आयाम देत एक आदर्श उपक्रम राबविला.

विवाहासाठी उपस्थित सर्व मान्यवर, पाहुणे व नातेवाईकांना कलमी आंब्याची रोपे भेट देत पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

प्रगतशील दूध उत्पादक शेतकरी बाळासाहेब डोळे यांचे व पत्रकार सोमनाथ डोळे यांचे भाचे ऋषिकेश यांचा विवाह राहुरी तालुक्यातील चिंचोली येथील प्रगतशील शेतकरी ज्ञानदेव दाढडकर यांची कन्या साक्षी हिच्याशी नुकताच मंगलमय वातावरणात पार पडला.

या विवाह सोहळ्यास विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शिक्षक, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा सन्मान पारंपरिक शाल-श्रीफळाऐवजी कलमी आंबा रोपे देऊन करण्यात आला.

या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक झाले. विवाहप्रसंगी हभप दत्तगिरी महाराज, बालब्रह्मचारी हनुमान भक्त बाळकृष्ण महाराज



कुलकर्णी, हभप कुहिले महाराज तसेच महंत माणिक गिरी महाराज यांचे आशीर्वाद लाभले. वेळेचे योग्य नियोजन ठेवत फक्त महाराज व महंत यांचेच आशीर्वाद घेण्यात आल्याने कार्यक्रम शिस्तबद्ध व वेळेत पार पडला.

आजच्या काळात विवाह सोहळ्यांमध्ये खर्च व दिखाऊपणा वाढताना दिसतो. मात्र चौधरी कुटुंबाने एक पाहुणा – एक आंबा रोप हा उपक्रम राबवून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात फळझाडांची लागवड वाढीस लागणार असून हा विवाह सामाजिक दृष्टिकोनातून आदर्श ठरला आहे.

# यश-अपयश पचविण्याची क्षमताच तुम्हाला यशस्वी करेल : गणेश पिंगळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** ''उत्तम नियोजन, अविरत कष्ट आणि वेळेचा सदुपयोग आपल्याला जीवनात यशस्वी बनवतील. यश आणि अपयश या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या दोन्ही गोष्टी जो विद्यार्थी पचवण्याची क्षमता निर्माण करेल, तोच खऱ्या अर्थाने आयुष्यात यशस्वी ठरेल,'' असे प्रतिपादन घुमनदेव जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गणेश पिंगळे यांनी व्यक्त केले. येथील महाराष्ट्र सेवा मंडळाच्या प्रेमजी रतनसी पटेल हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला, याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त नारायणराव डावखर होते. या



सोहळ्याला दानशूर व्यक्तिमत्व संतोषशेठ कासलीवल, तहसील कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी अशोक नरोड, न्यू इंग्लिश स्कूलचे वरिष्ठ लिपिक दिनेश तरटे, पत्रकार संदीप पाळंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात नारायण डावखर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देत संस्थेच्या वाटचालीत विद्यार्थ्यांचे स्थान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. संतोष कासलीवाल यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच सामाजिक भान जपण्याचे आवाहन केले. सहाय्यक महसूल अधिकारी अशोक नरोड यांनी प्रशासकीय सेवेतील संधींविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर माळी यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक दिलीप शेवाळे, शिक्षक नानासाहेब मेहेत्रे, फारुख सय्यद, संजय कुऱ्हे, प्रमोद हरदास, सागर माळी, अतुल खर्डे, अमोल आंधळे, प्रविण शेंडगे, परशराम वेताळ, इंद्रसिंग साठे, बाळासाहेब मांजरे,समाधान लोखंडे यांनी परिश्रम घेतले. शेवटी मुख्याध्यापक दिलीप शेवाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# ज्ञानेश कमानदार यांची तालुका कृषी अधिकारी पदी निवड

**कुकाणा :** नेवासा तालुक्यातील बाभूळखेडा येथील रहीवासी व सध्या सातारा जिल्हा परिषदेत ग्रामपंचायत अधिकारी म्हणून कार्यरत असलेले ज्ञानेश बद्रीनाथ कमानदार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत राज्यात ४८ व्या रँकने तालुका




कृषी अधिकारी पदी निवड झाली.ज्ञानेश कमानदार यांचे बाभूळखेडा येथे पहिली ते चौथी प्राथमिक शिक्षण,जळका येथील गुरुदास भास्करगिरी महाराज विदयालयात ५ वी ते १० वी माध्यमिक शिक्षण,११ वी १२वी लोणी येथील पद्मश्री विखे पाटील पब्लिक स्कूल मध्ये तर सोनई कृषी महाविद्यालयात कृषी पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झालेले आहे.सन २०२५ मध्ये त्यांची ग्रामपंचायत अधिकारी पदी निवड झाल्याने ते सध्या सातारा जिल्हा परिषदेत कार्यरत आहेत.

# परमार्थातूनच खरा माणूस घडतो :
## हभप उद्धव महाराज मंडलिक



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** मन आणि बुद्धी शांत करण्यासाठी कीर्तन हे प्रभावी माध्यम असून परमार्थाच्या मार्गातूनच खऱ्या अर्थाने माणूस घडतो, असे प्रतिपादन वरद विनायक सेवा धामचे ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांनी केले. राहुरी फॅक्टरीतील चोथे वस्ती येथे आयोजित साई चरित्र पारायण सोहळ्याची सांगता उद्धव महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. प्रसंगी ते बोलत होते. यावेळी संतपूजन आदर्श नागरी पतसंस्थेचे चेअरमन सुधाकर कदम व नगरसेविका सुजाता कदम यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना उद्धव महाराज मंडलिक म्हणाले की, सध्याच्या तणावपूर्ण सामाजिक वातावरणात अध्यात्म, नामस्मरण आणि कीर्तन परंपरेचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. या माध्यमातून समाजात सकारात्मकता व संस्कारांची जपणूक होते. यावेळी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, साई आदर्श मल्टिस्टेटचे चेअरमन शिवजीराव कपाळे, प्रेरणा मल्टीस्टेट चे चेअरमन सुरेश वाबळे, उद्योजक सतीश तनपुरे, आदर्श पतसंस्थेचे व्हा. चेअरमन आबासाहेब वाळुंज, नगरसेवक शरद वाळुंज, प्रशांत डौले, डॉ. तनपुरे कारखान्याचे संचालक अशोक उर्हे, मारुती हारदे, संदीप खुरूद, अशोक मुसमाडे, भागवत वाळुंज, केदारनाथ चव्हाण, प्रकाश भुजाडी, माजी नगरसेवक सचिन ढुस, डॉ. संदीप मुसमाडे, सुखदेव मुसमाडे, शांती चौक मित्र मंडळाचे अध्यक्ष दीपक त्रिभुवन, प्रा. विलास मुसमाडे, विष्णुपंत वर्पे, कारभारी वाळुंज, अशोक खुरूद, वैभव गिरमे, प्रकाश सोनी, सुखदेव घुले, भास्कर तांबे, किशोर कोबरने, विठ्ठल चव्हाण, भास्कर कोळसे आदींसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यात्रा काळात चोख बंदोबस्त पो. नि. महेश पाटील यांचा गौरव



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथे नुकत्याच पार पडलेल्या श्री मोहिनीराजांच्या यात्रा काळात नेवासा पोलीस दलाने चोख बंदोबस्त दिल्यामुळे महिलांसह युवती व बाळ गोपाळांना यात्रेचा आनंद चांगल्या पद्धतीने घेता आला. चांगल्या कामाचे कौतुक म्हणून महिला भगिनींनी पोलीस दलाचा गौरव म्हणून पोलीस निरीक्षक महेश पाटील यांचा सत्कार केला.

यावेळी भगिनींशी संवाद साधतांना पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी आलेल्या महिला भगिनींचे स्वागत केले. तर पोलीस प्रशासन महिलांच्या उपक्रमासाठी नेहमीच पाठबळ देत राहील अशी ग्वाही देत त्यांची नेवासा पोलीस स्टेशन मार्फत लवकरच महिलांची दक्षता कमिटीची स्थापना करणार असल्याचे जाहीर केले.

यात्रा उत्सवात चौकाचौकात चोख बंदोबस्त ठेवल्याबद्दल तसेच यात्रेतील इतर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पोलीस, कमांडर,होमगार्ड यांना बरोबर घेऊन आपले कर्तव्य चोखपणे बजावल्याबद्दल पोलीस निरीक्षक महेश पाटील यांचे बुके,शाल व पेढे देऊन स्वागत केले. कार्यक्रम प्रसंगी बदामबाई गांधी विद्यालयाच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका साधनाताई मुळे, शिवसेना महिला आघाडीच्या तालुका प्रमुख शोभाताई आलवणे,नेवासा नगरपंचायतच्या नगरसेविका जयश्रीताई शिंदे, नगरसेविका भारतीताई कृष्णा परदेशी, संगीता चव्हाण, तृप्ती देवचक्के, कावेरी मापारी, उपस्थित होत्या. अर्चनाताई कुंभकर्णी यांनी आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

## सुषमा दळवी देडगावच्या उपसरपंचपदी बिनविरोध



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील सुषमा आनंद दळवी यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड सरपंच चंद्रकांत मुंगसे यांच्या अध्यक्षतेखाली तर निवडणूक अधिकारी म्हणून ग्रामविकास अधिकारी संतोष उल्हारे यांनी काम पाहिले. या निवडीसाठी सूचना पोपट विठ्ठल मुंगसे यांनी मांडली तर अनुमोदन राधिका अनिकेत मुथा यांनी दिले. या ग्रामपंचायत उपसरपंच पदाला रोटेशन पद्धतीने ठरवलेले असून माजी उपसरपंच बाळासाहेब मुंगसे यांनी मनाचा मोठेपणा करत स्वतःहून राजीनामा दिला होता. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे. या निवडीसाठी ज्येष्ठ नागरिक बाजीराव पाटील मुंगसे, खरेदी विक्री संघाचे माजी संचालक कडूभाऊ तांबे, ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक जनार्दन कदम, माजी चेअरमन बाबासाहेब मुंगसे उपस्थित होते.तर नूतन उपसरपंच सुषमा आनंद दळवी व सदस्याचे स्वागत सरपंच चंद्रकांत पाटील मुंगसे यांनी केले.

## टोके ही पेशव्यांची सांस्कृतिक राजधानी : डॉ. वाव्हळ



**कुकाणा** : टोके हे पेशव्यांच्या काळात सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जात होते. येथे पेशवेकालीन वास्तुकलेची मोठ्या प्रमाणात भरभराट झाली असून भव्यदिव्य हवेल्या, ऐतिहासिक वाडे, आठ घाट यांसारखी समृद्ध सांस्कृतिक वारसा स्थळे आजही इतिहासाची साक्ष देतात, असे प्रतिपादन न्यू आर्टस् अँड सायन्स महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील इतिहास संशोधक डॉ. नवनाथ वाव्हळ यांनी केले. पुणे विद्यापीठ व जिजामाता महाविद्यालय, भेंडे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय एक दिवसीय 'ऐतिहासिक स्थळे दत्तक योजना' अंतर्गत ऐतिहासिक स्थळे संवर्धन कार्यशाळा सिध्देश्वर मंदिर, टोका प्रवरासंगम येथे पार पडली. या कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. डॉ. वाव्हळ म्हणाले की, सध्या टोका परिसरात अनेक पेशवेकालीन वास्तू भग्नावस्थेत असून त्यांचे जतन व संवर्धन होणे अत्यंत गरजेचे आहे. येथील सिध्देश्वर शिवालय हे मराठा स्थापत्यकलेचे सर्वोत्तम उदाहरण मानले जाते. त्याची स्थापत्यशैली अद्भुत व असामान्य असून ती पुढील पिढ्यांसाठी जपली पाहिजे. कार्यशाळेचे प्रास्ताविक विभाग समन्वयक व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संजय महेर यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे होते. यावेळी विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक वारसा जतन करण्याची शपथ घेतली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. मोहिनी साठे यांनी तर आभार प्रा. वैभव लाटे यांनी मानले.

## टीईटी परीक्षेत विशाल निचळ यांचे यश



**संगमनेर** : तालुक्यातील सावरगाव तळ येथील इंग्रजी विषयाचे उपशिक्षक म्हणून कार्यरत असलेले विशाल प्रमिला विजय निचळ यांनी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) मध्ये यश संपादन केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात नोव्हेंबर महिन्यात घेण्यात आलेल्या टीईटी परीक्षेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण १ लाख २५ हजार ७४८ उमेदवारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी केवळ ४ हजार २५ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. निचळ यांनी पेपर क्रमांक २ (सामाजिक शास्त्रे) या विषयामध्ये पात्रता मिळवली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने, स्थानिक स्कूलकमिटी व ग्रामस्थांच्या वतीने शिक्षक विशाल निचळ यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# वांबोरी चारीच्या कामात दिरंगाई, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे आक्रमक !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहूरी** : वांबोरी चारी धामोरी परिसरात चारी नादुरुस्त झाल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. या समस्याची गांभीर्याने दखल घेत माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली. चारीच्या दुरावस्थेमुळे पाणी वाया जात असून शेतात पाणी शिरल्याने पिकांचे नुकसान होत असल्याचा तक्रारी शेतकऱ्यांनी यावेळी तनपुरे यांच्यासमोर मांडल्या.



गेल्या काही दिवसांपासून चारीला भगदाड पडल्याने किंवा पाणी गळती होत असल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. वारंवार मागणी करूनही दुरुस्ती होत नसल्याने तनपुरे यांनी थेट बांधावर जाऊन पाहणी केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यावेळी बाबासाहेब सोनवणे, अभय सोनवणे, भाऊसाहेब जाधव, जयराम खेडेकर, उत्तम उगले, नानासाहेब सोनवणे, दीपक उगले, जगन्नाथ उगले, लहाणु उगले व इतर ग्रामस्थांचा समावेश होता. चारीच्या कामाला लवकरच सुरुवात न झाल्यास पुढील आंदोलनात्मक पावले उचलली जातील, असा इशारा यावेळी देण्यात आला.

### भ्रमणध्वनीवरून 'लेफ्ट-राईट'

पाहणी दरम्यान चारीची दयनीय अवस्था पाहून प्राजक्त तनपुरे यांनी संताप व्यक्त केला. त्यांनी तात्काळ भ्रमणध्वनीद्वारे संबंधित अभियंता सायली पाटील यांच्याशी संपर्क साधला. शेतकऱ्यांचे नुकसान सहन केले जाणार नाही, अशा शब्दात त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले. तसेच, नादुरुस्त चारीची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी आणि ज्या शेतकऱ्यांचे पाणी शेतात शिरल्याने नुकसान झाले आहे, त्याबाबत योग्य कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## उत्तम अभ्यासाबरोबरच चांगला माणूस बनणे आवश्यक : वाघ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : लोकनेते डॉ बाळासाहेब विखे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कोल्हार येथील प्रवरा हायस्कूल या सीबीएसई शाळेत आज विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी सुरक्षा,वाहतुकीचे नियम, विद्यार्थी हक्क आणि कर्तव्य, अशा विषयांवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ उपस्थित होते.कार्यशाळेच्या सुरुवातीस विद्यालयाचे प्राचार्य सुधीर मोरे यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांची ओळख आणि विषयाचे महत्त्व स्पष्ट केले. आपल्या मार्गदर्शनामध्ये पीआय कैलास वाघ यांनी विद्यार्थ्यांच्या अंगी शिस्त बरोबरच कष्ट आणि प्रामाणिकता अंगी असेल तर परमेश्वर देखील आपल्या पाठीशी उभा राहतो असल्याचे सांगितले. केवळ अभ्यासावरच अवलंबून न राहता आपली रुची कोणत्या विषयांमध्ये आहे त्या विषयांमध्ये करिअर करण्याची मोठी संधी आपल्यास उपलब्ध असल्याचे देखील ते म्हणाले.उत्तम मार्क मिळवून गुणवत्ता सिद्ध करणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच महत्त्वाचे समाजामध्ये चांगला माणूस म्हणून ओळख निर्माण करणे महत्त्वाचे असते. आपल्या कार्यातून समाजामध्ये आपली ओळख निर्माण झाली पाहिजे.मोबाईलचा अतिरेक टाळणे विद्यार्थ्यांसाठी काळाची गरज आहे. समाजविघातक गोष्टींची माहिती बहुतेकदा मोबाईल सारख्या माध्यमातून विद्यार्थ्यांना होत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहावे. वाहतुकीचे नियम स्पष्ट करताना त्यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना हेल्मेटचा वापर सक्तीने करावा असे सुचवले. नवीन वाहतुकीच्या नियमानुसार पायी चालणाऱ्यांनी आपल्या उजव्या बाजूने चालावे.

मुलांनी मोटार सायकल सारख्या वाहनांचा वापर करू नये. विद्यालय हे पवित्र असे ठिकाण आहे. विद्यार्जन कार्य इथे चालते. गुरुजनांकडून मिळालेल्या ज्ञानाचा आपल्या अर्थार्जनासाठी वापर करणे उचित असते.विद्यार्थ्यांनी समाजामधील विघातक प्रवृत्तींपासून दूर राहावे. कोणत्याही प्रकाच्या गुंडागर्दी मध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊ नये. पोक्सो सारख्या कायद्याने विद्यार्थ्यांना अमर्याद असे संरक्षण दिलेले आहे. गुड टच बॅड टच या संकल्पना माहिती करून घ्याव्यात त्या ओळखाव्यात. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी शिक्षकांच्या माध्यमातून पोलीस स्टेशन पर्यंत पोहोचावे.समस्या झाकून ठेवल्याने ती वाढते. त्यामुळे कायद्याचे ज्ञान प्राप्त करावे. सामान्य ज्ञान वृद्धिंगत करावे. विविध स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करावा. आई-वडिलांनी उपलब्ध करून दिलेल्या संधीचा विनियोग करावा. भारतीय न्यायसंहितेमध्ये विद्यार्थ्यांच्या संरक्षण साठी विविध नियम बनवण्यात आलेले आहेत. त्या नियमांची सर्वांनी माहिती करून घ्यावी. आपले हक्क आणि कर्तव्य याबाबत विद्यार्थ्यांनी जागरूक राहावे. पीआय वाघ यांनी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची मने जाणून घेऊन त्या अनुषंगाने त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी आव्हाड यांनी केले तर आभार गोविंद तांबे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कदीर शेख आणि ललित तक्ते यांनी मेहनत घेतली.

## विविध मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका युनियनचे निदर्शने

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर नेवासा येथे अंगणवाडी सेविका-मदतनीस कर्मचारी युनियनच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी नेवासा तहसील कार्यालयासमोर निदर्शने करून ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व युनियनच्या जिल्हाध्यक्षा श्रीमती मदिना शेख यांनी केले.यावेळी कामगारविरोधी व मालक धार्जिण्या चार श्रमसंहिता तातडीने मागे घ्याव्यात, सर्व कामगार कायदे पुन्हा बहाल करावेत, तसेच लोकशाही अधिकारांवर गदा आणणारे महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक रद्द करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याची भारतीय श्रम परिषदेची शिफारस अंमलात आणावी, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना वेतनाचा दर्जा देऊन ग्रॅच्युइटी लागू करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.तसेच अंगणवाडी सेविका-मदतनीसांना वर्ग ३ व ४ चा दर्जा देऊन वेतनश्रेणी, महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युइटी व मासिक पेन्शन लागू करावी, मान्य केल्यानुसार ५,००० व ३,००० रुपयांची मानधनवाढ तात्काळ लागू करावी, अशी मागणी करण्यात आली. निकृष्ट दर्जाचा टीएचआर बंद करून गरम, ताजा आहार किंवा कोरडा शिधा देण्यात यावा, आधार व एफआरएस अटी रद्द कराव्यात, तसेच लोकसंख्येनुसार नवीन अंगणवाड्या मंजूर कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली.

# राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत 'ध्रुव ग्लोबल' चॅम्पियन! पाँडिचेरीत पार पडली स्पर्धा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : पाँडिचेरी येथे पार पडलेल्या अकराव्या सब-ज्युनिअर, ज्युनिअर व सिनिअर राष्ट्रीय स्पोर्ट्स डान्स स्पर्धेत संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलने देदीप्यमान यश मिळवले. वैयक्तिक आणि सांघिक अशा दोन्ही प्रकारांमध्ये आपला दबदबा निर्माण करताना ध्रुवच्या २० स्पर्धकांनी ३४ सुवर्ण पदकासह एका रौप्य पदकाची कमाई करताना स्पर्धेच्या चॅम्पियनशिपचा किताबही पटकावला. या स्पर्धेत महाराष्ट्रासह सात राज्यातील पाचशेहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.




शास्त्रीय नृत्यप्रकारातील वैयक्तिक नऊ वर्षांखालील गटात ध्रुव ग्लोबल स्कूलच्या तेजस्वीनी महापात्राने सुवर्णपदकासह शाळेचे खाते उघडले. १३ वर्षांखालील गटात ओवी ठोंबरेला मात्र रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. ध्रुवच्या स्पर्धकांनी मिळवलेल्या एकूण ३५ पदकांमधील हे पदक एकमेव ठरले. वैयक्तिकगटासह सांघिक प्रदर्शनातही आपला दबदबा राखताना १३ वर्षांखालील लोकनृत्य प्रकारात वीरा हासे, दान्या कालडा, अवनी कालडा, कांदबरी मोरे, मोनिका कानकाटे, देवश्री देशमुख, राजकुंवर गोडसे, आरोही कालडा आणि काव्या माळवे या स्पर्धकांनी सुवर्ण कामगिरी केली.याच वयोगटातील शास्त्रीय नृत्यप्रकारात तेजस्वीनी महापात्रा, मोनिशा कानकाटे, देवश्री देशमुख, राजकुंवर गोडसे, काव्या माळवे, आराध्या फलके आणि कर्तव्या चौधरी यांनीही सुवर्ण पदकांसह या वयोगटावर आपले वर्चस्व निर्माण केले. सतरा वर्षांखालील लोकनृत्य प्रकारात आराध्या रहाणे, रितिका शहा, मधुरा कानवडे, आरणा भक्कड, आराध्या पुजारी, ईश्वरी खताळ यांच्या संघाने जोरदार सादरीकरणातून सुवर्ण पदकं पटकावले. तर, शास्त्रीय नृत्यप्रकारातही लोकनृत्यात यश मिळवलेल्या मुलींसह ओवी ठोंबरे, यशोधरा नाईकवाडी, आराध्या फलके व कर्तव्या चौधरी यांच्या संघाने प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक मिळवले. एकूण स्पर्धेतील कामगिरीच्या बळावर ध्रुव ग्लोबल स्कूलला अकराव्या राष्ट्रीय स्पोर्ट्स डान्स स्पर्धेच्या 'चॅम्पियनशिप'चा किताब देवून गौरवण्यात आले. राष्ट्रीय स्पर्धेत मिळालेल्या या घवघवीत यशाबद्दल शाळेचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी, व्हा.चेअरमन गिरीश मालपाणी व प्राचार्या अर्चना घोरपडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## शिवजयंती महोत्सव समिती बैठक संपन्न



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर येथे दरवर्षी शिवजयंती महोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोष साजरा केला जातो. श्रीरामपूर तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातील सर्वांनी श्रीरामपूर येथे गुरुवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ठीक ९ वाजता आयोजित केलेल्या शिवजयंती महोत्सवामध्ये मिरवणुकीसाठी एकत्रित येऊन मोठ्या आनंदामध्ये साजरा करावा. असे आवाहन श्रीरामपूर येथील शिवजयंती महोत्सव समिती पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले. श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील हनुमान मंदिरामध्ये श्रीरामपूर येथे होणाऱ्या शिवजयंती महोत्सव कार्यक्रमानिमित्त गावातील ग्रामस्थांची बैठक पार पडली. याप्रसंगी गावातील ग्रामस्थ, तरुण युवक उपस्थित होते.

यावेळी श्रीरामपूर शिवजयंती महोत्सव समितीचे निमंत्रक नागेश सावंत म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जातीतील बांधवांना बरोबर घेऊन स्वराज्याची मुहूर्त मेढ रोवली. छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार व आदर्श घेऊन आपण श्रीरामपूर तालुक्यातील सर्व नागरिकांनी श्रीरामपूर येथे शिवजयंती महोत्सवामध्ये सहभागी होऊन आगामी शिवजयंती महोत्सव मोठ्या आनंदामध्ये साजरा करावा असे ते म्हणाले. ग्रामीण भागातील शिवप्रेमींनी मोटर सायकल रॅलीमध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी शरदराव नवले यांनी या कार्यक्रमाबद्दल काही सूचना केल्या. यावेळी गणेश राशिनकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकी प्रसंगी श्रीरामपूर शिवजयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी तसेच टाकळीभान येथील माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, प्राचार्य जयकर मगर,अनिल बोडखे, डॉ. किशोर हुळहुळे, विलास बोडखे,सुनील बोडखे, पत्रकार दिलीप लोखंडे ,अर्जुन राऊत,शिवाजी पटारे, बंडोपंत कोकणे ,भाऊसाहेब गव्हाणे, सुरेश पटारे, आदीसह तरुण युवक व ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वांचे आभार सुनील बोडखे यांनी मानले.

## अमेरिकेसोबतचा करार; शेतकऱ्यांचा तीव्र निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : भारत सरकारने अमेरिकेबरोबर केलेल्या करारा विरोधात पुणतांबा येथील शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. मंगळवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास शेतकरी संपाचे नेतृत्व करणारे नेते बाळासाहेब चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अनेक शेतकरी ग्रामपंचायत इमारतीसमोरील बळीराजाच्या पुतळ्यासमोर एकत्र जमले. बळीराजाला अभिवादन करून शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या या निर्णयाचा जाहीर निषेध केला.

यावेळी बोलताना बाळासाहेब चव्हाण म्हणाले की, भारत सरकारने अमेरिकेसोबत केलेला करार हा पूर्णपणे शेतकरीविरोधी असून शेतकऱ्यांच्या हिताला बाधा



आणणारा आहे. केंद्र सरकारच्या धोरणांमुळे आधीच शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला असताना, या करारामुळे देशातील शेतकरी पूर्णपणे उध्वस्त होण्याची भीती आहे. हा करार तातडीने रद्द करण्यात यावा, अन्यथा देशात शेतकरी आंदोलन तीव्र केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## जाहीर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर/२३१/२०२५
नेवासा दिनांक २३/०१/२०२६

अर्जदार श्री/ श्रीम-महेश भागचंद लिपणे रा. नांदूर शिकारी. ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. महेश भागचंद लिपणे रा. नांदूर शिकारी, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे. अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-महेश भागचंद लिपणे, गावाचे नाव-नांदूर शिकारी, जन्म दिनांक-१४/०५/२००० करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

शिक्का
**तहलिलमंदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहीर प्रगटन

समस्त गावकरी कोकणगाव, ता.कर्जत, जिल्हा अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री./श्रीम/दत्तात्रय शिवराम शिंदे, रा.देवीगव्हाण, ता.आष्टी, जिल्हा बीड यांनी त्यांच्या नामे ओम दत्तात्रय शिंदे यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे. सदरील व्यक्तीचा जन्म, कोकणगाव, ता.कर्जत, जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी दि.१३/०१/२०१० रोजी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणेसंबंधी दि.१२/०९/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे. वरील व्यक्तींच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का
**(गुरु बिराजदार)**
**तहसिलदार कर्जत**

## राहुरी नगरपरिषद, राहुरी

जा.क्र.कावि. ०९/१२८ / आरोग्य /२०२६
दिनांक १२/०२/२०२६

### जाहीर निविदा सुचना

राहुरी नगरपरिषद, निधीतुन खालील प्रमाणे काम हाती घ्यावयाचे आहे. त्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार / अधिकृत दुकानदार / अनुभवी मक्तेदार/यांच्याकडुन खालील निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | निविदा इसारा | कोरे निविदा फॉर्म |
|---|---|---|---|
| १. | खत गोणी ५० किलोची छपाईसह २००० नग पुरवठा करणे बाबत | ५०० | २०० |

**नियम व अटी** - १. कोरे निविदा फॉर्म दि.१६/०२/२०२६ ते दि.२०/०२/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील. २. मोहोरबंद निविदा दि. २०/०२/२०२६ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नागरी सुविधा केंद्रात स्विकारल्या जातील. ३. शक्य झाल्यास प्राप्त निविदा मे. मुख्याधिकारी साहेब यांचे दालनात किंवा मे. सभेत निविदा धारक किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडल्या जातील. ४. इतर अटी व शर्ती नगरपरिषदेत पहावयास मिळतील. त्याची माहिती घेऊनच निविदा सादर करावी. ५. निविदे संदर्भात सविस्तर माहिती नगरपरिषदेच्या आरोग्य विभागात समक्ष मिळेल. ६. निविदा मंजुरी नंतर ३% निविदा अनामत भरुन योग्य त्या किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. ७. बिलातुन आयकर व इतर शासकीय कर कपात केले जातील. ८. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे हक्क नगरपरिषदेने राखुन ठेवले आहे.

शिक्का
**मुख्याधिकारी**
**राहुरी नगरपरिषद, राहुरी**

# चिमुकल्यांच्या शिक्षणासाठी पायपीट थांबली !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील पानोडी अंतर्गत असलेल्या हजारवाडी येथील 'सुळवस्ती-कोळेकरवस्ती' अंगणवाडीच्या नूतन इमारतीचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या अंगणवाडीमुळे सुळवस्ती आणि ढोणेवस्तीवरील चिमुकल्यांचा शिक्षणासाठी होणारा ३ किलोमीटरचा त्रास आता वाचणार असून, त्यांच्या घरापर्यंत ज्ञानाचे दरवाजे खुले झाले आहेत. हक्काची अंगणवाडी मिळाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे.



या अंगणवाडीसाठी जागेचा प्रश्न अत्यंत बिकट झाला होता. मात्र, सामाजिक बांधिलकी जपत मुक्ता म्हाळू ढोणे यांनी मनाचा मोठेपणा दाखवून स्वतः ची जागा अंगणवाडीसाठी दान (बक्षीस) दिली. त्यांच्या या दातृत्वामुळेच ही सुंदर इमारत उभी राहू शकली. याबद्दल मुक्ता ढोणे यांचा त्यांच्या पतीसह विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, त्यांचे वडील म्हाळू कांडाजी ढोणे यांचाही सन्मान करण्यात आला. म्हाळू ढोणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडला.

याप्रसंगी सरपंच गणपत हजारे आणि उपसरपंच विक्रमराजे थोरात यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अंगणवाडी मंजुरीपासून ते इमारत पूर्ण होईपर्यंत आलेल्या विविध प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणींचा त्यांनी पाढा वाचला. सर्व सदस्यांनी एकजुटीने प्रयत्न केल्यामुळेच हा प्रकल्प पूर्णत्वास आल्याचे त्यांनी सांगितले . याप्रसंगी कारभारी हजारे, अंगणवाडी सेविका बेबी खेडकर , वंदना खंडागळे आणि वनिता जाधव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्या चंद्रकला भास्कर सूळ, देवराम हजारे, मधुकर सानप, सूर्यभान थोरात, विठ्ठल घोडेकर, सोपान सुळ, भास्कर सुळ, गवाजी कोळेकर, धोंडीबा हजारे, मुक्ता हजारे, सावळेराम रूपनर, शिवलाल कोळेकर, गोंडा कोरडकर, संतोष ढोणे, आनंदा तळेकर, रामा थोरात यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार अंगणवाडी सेविका शिला म्हाळू हजारे यांनी केले.

## पान १ वरुन

### महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या फसवणुकीचा तपास केंद्रीय संस्थांमार्फत करा!

गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली. ज्यादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून गुंतवणूक करून घेतल्यानंतर पैसे परत न देणे, धमकावणे, आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आरोप संबंधित संस्थांवर आहेत. या प्रकरणाची ईडी, सीबीआय यासारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी कार्यालय दिल्लीतील 'सेवा तीर्थ' या नवीन इमारतीत स्थलांतर झाल्यानंतर लोकप्रतिनिधींना तेथे अधिकृत कामासाठी प्रवेश नाकारला जात आहे, त्यामुळे गंभीर आजारी नागरिकांच्या मदत प्रकरणांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. लोकप्रतिनिधींना त्या विभागात प्रवेश देण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, अशा मागणीची निवेदनही लंके यांनी गृहमंत्र्यांना दिले. पुणे येथील गुन्हा शाखेच्या युनिट-१३ (गुप्तचर विभाग) कामकाज न्यायालयाच्या आदेशानुसारही अद्याप सुरू झालेले नाही. तसेच तेथील १७० कर्मचाऱ्यांचे १८ महिन्यांचे वेतन थकीत राहिले आहे. परिणामी त्यांच्या कुटुंबावर गंभीर आर्थिक संकट ओढावले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार युनिट- १३ चे कामकाज तातडीने सुरू करून सर्व थकीत वेतन अदा करावे, अशीही मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

# कामगार-शेतकरी विरोधी धोरणांच्या निषेधार्थ

## तहसील कार्यालयावर निदर्शने

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघ संलग्न एक्टू आणि केंद्रीय कामगार - शेतकरी संघटना संयुक्त समिती यांच्या नेतृत्वाखाली काल १२ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्र व केंद्र व राज्य सरकारच्या कामगार-शेतकरी विरोधी कायदे रद्द करा यासह विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सार्वत्रिक देशव्यापी संपाचे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर जीवन सुरुडे, श्रीकृष्ण बडाख यांच्या नेतृत्वाखाली श्रीरामपूर येथील तहसील कार्यालयावर जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी पंतप्रधान व राज्याचे मुख्यमंत्री यांना श्रीरामपूरचे नायब तहसिलदार दत्तात्रय शेकटकर यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.




यावेळी जीवन सुरुडे म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारने महागाई कमी करण्या ऐवजी शासकीय सेवांचे कंत्राटीकरण करून कामगारांना किमान वेतन न देता व शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव न देता त्याची लूट करीत आहे. शेतीमालाचे भाव सातत्याने पाडले जात आहेत. कांदा, टोमॅटो, सोयाबीन, दूध, कापूस यासारख्या शेतीमालाचे भाव पाडून शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण जनतेचे उत्पन्न निम्म्यावर आणले आहे. राज्यात देवस्थान व इनाम जमिनी व खाजगी फर्मच्या जमिनी वर्षानुवर्ष ताब्यात असलेल्या कब्जेधारकांच्या जमिनी त्यांच्या नावे करण्याचा ज्वलंत प्रश्न अजूनही अनिर्णीत आहे. शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी यांच्या घटनात्मक अधिकारा विरोधात आज आम्ही निदर्शने करत आहोत.सदर आंदोलनात जीवन सुरूडे, श्रीकृष्ण बडाख, रतन गोरे, प्रहार संघटनेचे ॲड. पांडुरंग औताडे यांची भाषणे झाली. आंदोलन यशस्वी करण्यासाठी कॉ. उत्तम माळी, प्रकाश भांड, अरुण बर्डे, प्रकाश पवार, रतन गोरे, निर्मला चांदेकर, रोशन शेख, अलका आदिक, शोभा विसपुते, शकुंतला बिलावरे, रंजना केदारी, आशा जाधव, संगीता शिंदे, सविता पडोळे, स्वाती गाढे, मंदा गोरे, विद्या वमने, अश्विनी वेताळ, मंदा वैद्य, विमल गायकवाड, आशा वाकळे, सरूबाई साळवे आदींसह अंगणवाडी कर्मचारी, कामगार, कष्टकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### कौशल्या हरदास



**श्रीरामपूर :**शहरातील वॉर्ड नं. ७, मोरगे वस्ती परिसरात वास्तव्यास असलेल्या कौशल्या पुंजा हरदास (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्या शांतीनाथ, बाळासाहेब, तात्या हरदास व आशाबाई सोपान साळुंके यांच्या त्या मातोश्री तसेच योगेश, जनार्दन, शुभम व ऋषिकेश हरदास यांच्या त्या आजी होत.

### नानासाहेब जाधव



**कोल्हार :** राहता तालुक्यातील तिसगाववाडी येथील रहिवासी ज्योतिष शास्त्राचे गाढे अभ्यासक नानासाहेब यमाजी जाधव (वय ९१) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले दोन मुली सुना नातवंड जावई असा मोठा परिवार आहे. ते जनार्दन जाधव व विलास जाधव यांचे वडील होत.

# नगरसेवकाच्या सुचनेनंतर धोकादायक डीपीला एका तासात झाकण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** येथील चाकण रोडवरील नगरपरिषद शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराशेजारी उघड्या अवस्थेत असलेल्या वीज वितरण पॅनल (डीपी) मुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या धोकादायक परिस्थितीकडे स्थानिक नगरसेवक सुनिल घुंडरे यांनी तत्काळ लक्ष वेधत प्रशासनाशी संपर्क साधला. त्यांच्या सूचनेनंतर अवघ्या एका तासात संबंधित विभागाने घटनास्थळी धाव घेत डीपीला सुरक्षित झाकण बसविले.

शाळा परिसरात लहान मुले ये-जा करत असल्याने उघडी डीपी ही संभाव्य अपघाताला आमंत्रण देणारी ठरत होती. नागरिक आणि पालकांमध्ये याबाबत चिंता व्यक्त होत होती. ही बाब समजताच नगरसेवक सुनिल घुंडरे यांनी वीज वितरण विभागाशी



थेट संपर्क साधून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. प्रशासनानेही तत्परता दाखवत कर्मचाऱ्यांना त्वरित पाठवून डीपीला मजबूत झाकण बसविले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मार्गी लागला असून पालक आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यावेळी बोलताना नगरसेवक सुनिल घुंडरे म्हणाले, शाळा परिसर हा विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. उघडी वीज डीपी ही गंभीर दुर्घटनेचे कारण ठरू शकली असती. नागरिकांकडून माहिती मिळताच मी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधला. प्रशासनानेही सकारात्मक प्रतिसाद देत त्वरित कार्यवाही केली, याबद्दल त्यांचे आभार. भविष्यात अशा धोकादायक बाबी आढळल्यास नागरिकांनी तत्काळ कळवावे; सुरक्षित आळंदी हे आपले सामूहिक ध्येय आहे.

# अठ्ठावीस वर्षांनंतर पुन्हा जुळले मैत्रीचे धागे

## न्यू हायस्कूल ढोरेगावचा स्नेहमेळावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर:** पुढे सरकला, जबाबदाऱ्या वाढल्या; मात्र शाळेच्या अंगणात उमटलेल्या पावलांच्या आठवणी आजही तितक्याच जिवंत आहेत. न्यू हायस्कूल ढोरेगाव येथील इयत्ता दहावी १९९७-९८ बॅचचा स्नेहमेळावा रविवार,दि. ०८ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम केवळ एक औपचारिक भेट नव्हता,तर सर्वांना पुन्हा एकदा बालपणात घेऊन जाणारा भावनांचा प्रवास ठरला.



तब्बल अठ्ठावीस वर्षांनंतर एकमेकांना भेटताच जणू काळच थांबला. जुन्या वर्गखोल्या, घंटीचा आवाज, मित्रांचे हसरे चेहरे आणि शिक्षकांचा ओळखीचा आवाज – सगळे काही पुन्हा जिवंत झाल्याची अनुभूती सर्वांनी घेतली. हास्याच्या आड दडलेल्या हळव्या भावना अनेकांच्या डोळ्यांतून व्यक्त होत होत्या.

या स्नेहमेळाव्यास जिल्हा परिषद शिक्षक दिलावर शेख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आपल्या विद्यार्थ्यांना समाजाच्या विविध क्षेत्रांत यशस्वी होताना पाहण्याचा अभिमान त्यांच्या शब्दांतून स्पष्ट जाणवत होता. शाळा ही केवळ शिक्षण देणारी जागा नसून संस्कार घडवणारी पवित्र भूमी आहे. विद्यार्थी घडताना पाहणे हेच शिक्षकांसाठी खरे समाधान, असे भावूक उद्गार त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास श्री.उत्तमराव बावस्कर व श्री.जयंत जागिरदार यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा संदेश पाठवून सहभाग नोंदवला. स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी अमिन पटेल, खंडेराव पवार, रघुनाथ पदार, नवनाथ साखरे, साहेबराव गायकवाड, सुलोचना सुरासे, हीरा पवार आदी माजी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भांडण सोडवणाऱ्या जेष्ठाला मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** येथील पोलीस ठाण्याच्या आवारातच कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणारी गंभीर घटना घडली आहे. भांडण मिटवण्यासाठी आलेल्या एका ज्येष्ठ नागरिकावर गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी २० ते २५ अनोळखी इसमांसह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी फिर्यादी रामेश्वर कन्हैयालाल मुंदडा (वय ६८, व्यवसाय शेती व व्यापार, रा. जाधव गल्ली, गंगापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता ते पोलीस ठाणे गंगापूर येथे भांडण मिटवण्यासाठी आले असता, आरोपींनी तुम्ही येथे कशाला आलात? असे म्हणत शिवीगाळ केली व त्यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून फिर्यादी व साक्षीदारांना जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणात आरोपी दिलीप निरपळ, बाळू शिंदे, विशाल निरपळ, संदेश निरपळ, संतोष पाचपुते, तसेच दिलीप निरपळ यांचे दोन पुतणे व २० ते २५ अनोळखी इसम यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर गुन्हा दि. ९ फेब्रुवारी रोजी पहाटे १.०७ वाजता दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. कुमारसिंग राठोड हे करत असुन उर्वरित अनोळखी आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलीस ठाण्याच्या आवारातच घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुढील तपास गंगापूर पोलीस करत आहेत.

# चौथ्या दिवशी बेलापूर - परळी रेल्वे मार्गासाठी उपोषण सुरूच रेल्वे प्रशासनाने फिरवली पाट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा :** बेलापूर परळी रेल्वे मार्गाच्या केंद्रीय मंजुरसाठी कुकाणा ता. नेवासा येथे सुरु असलेल्या अमरण उपोषणाचा काल गुरुवारी चौथ्या दिवशी ही उपोषण चालूच असून रेल्वे प्रशासनाने मात्र अद्याप पर्यंत पूर्ण पणे उपोषणाकडे पाठ फिरवली तर प्रशासन बघ्याची भूमिका घेत असल्याच्या भावना नागरिकांमधून येत आहेत.




प्रशासनाच्या विरोधी जनतेत रोष निर्माण होत असून, कोणत्याही क्षणी रस्ता रोको सारखी परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

उपोषणाच्या चौथ्या दिवशी मात्र उपोषण कर्त्यांना शारीरिक थकवा जाणवू लागला तसेच चक्कर येत असल्याचे उपोषण कर्त्यांनी म्हटले आहे, कूकाणा

प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, डॉ .डिंबर यांनी उपोषण कर्त्यांची गुरुवारी सकाळी तपासणी केली, तसेच उपोषण कर्ते रितेश भांडारी, सुरेश नरवणे,रज्जाक निजामशा इनामदार यांची प्रकृती खालवलीजात असून नागरिकांनी त्यांना उपचार घेण्याची विनंती केली परंतु उपोषण कर्त्यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे.

- शिर्डी लोकसभेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे तसेच नगरदक्षिणेचे खासदार निलेश लंके या दोन्हींनी फोन द्वारे उपोषण करते रितेश भंडारी यांच्याशी संपर्क केला त्यांनी रेल्वेमंत्र्याला भेटून लवकरच या मार्गावर तोडगा काढण्याचा शब्द दिला आहे,आमदार विठ्ठलराव लंघे तसेच माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी उपोषण सोडण्याची विनंती केली परंतु मंजुरीचे पत्र मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही उपोषणावर आम्ही ठाम आहोत असे उपोषणकर्त्यांनी सांगितले आहे.

# कवठे येमाईच्या फत्तेश्वर रोड नजीक दिवसा धाडसी चोरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** – शिरूर तालुक्याच्या पश्चिमेकडील कवठे येमाई च्या फत्तेश्वर महादेव मंदीर रोड जवळ वास्तव्यास असणारे शरद सुनील गायकवाड यांच्या बंद घराचे अज्ञात चोरट्यांनी भर दिवसा घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करीत धाडसी चोरी केली आहे. ही घटना बुधवार दि.११ ला दुपारी ११ ते ३ च्या दरम्यान घडली असल्याची माहिती शरद गायकवाड यांनी दिली.शरद गायकवाड शेतीच्या कामानिमित्ताने काल बुधवारी सकाळी ९ लाच कवठे येथून नातलग व कुटुंबासह शिरूर तहसील कार्यालय गेले होते. दरम्यान दुपारी दोन वाजता त्यांच्या वस्तीवरून तुमचे घर उघडे असून चोरी झाल्याचा प्रकार घडल्याची माहिती नजीकच्या माणसाने त्यांना फोन करून दिली.शरद यांनी तात्काळ कवठे येमाई येथे घरी पोहचत घडलेल्या घटनेची माहिती स्थानिक पोलीस पाटील गणेश पवार व शिरूर पोलिसांना दिली. भर दुपारी घडलेल्या या



चोरीच्या घटनेत चोरट्यांनी घरातील सुटकेस,पेटी उचकट त्यातील सोन्याचे साडेतीन तोळे सोने,चांदीचे दागिने,कागदपत्रे व रोख साडे हजार लांबवीले.या धाडसी चोरीत गायकवाड यांना सुमारे ५ लाख रुपयांचा फटका बसल्याचा अंदाज व्यक्त होत असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील गणेश पवार व शिरूर पोलिसांचे पथक काल सायंकाळीच घटनास्थळी दाखल झाले.घटनेची माहिती घेत पंचनामा करण्यात आला असून आज सकाळी ११ च्या दरम्यान श्वान पथक व ठसे तज्ज्ञ घटना स्थळी दाखल झाल्याची माहिती मिळाली. या दिवसाच घडलेल्या धाडसी चोरीचा पुढील तपास शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक दिलीप पवार व सहकारी करीत आहेत.

# म.ग्रा.रोहयो कर्मचाऱ्यांच्या संपामुळे लाभार्थ्यांचे कामे खोळंबली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** पंचायत समितीचे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी विभागातील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी संगणक चालकांच्या संपामुळे तालुक्यातील लाभार्थ्यांचे कामे खोळंबली. सध्या पंचायत समिती परिसरात शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

तसेच गेल्या सहा महिन्यांपासून लाभार्थ्यांचे मस्टरचे पैसे अडकले असुन अडकलेले पैसे व इतर कामे मार्गी लावण्याची मागणी लाभार्थ्यांकडुन करण्यात येत आहे. गंगापूर पंचायत समितीचे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी विभागातील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी संगणक चालकांनी गेल्या पंधरा दिवसांपासून विविध मागण्यासाठी संप पुकारला असुन यामुळे तालुक्यातील विविध गावात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचे विविध कामे खोळंबली आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना गावस्तरावर पंचायत समितीकडुन विविध योजना राबविल्या जातात. परंतु महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी विभागातील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी संगणक चालकांनी गेल्या पंधरा दिवसांपासून विविध मागण्यासाठी संप पुकारल्याने लाभार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागत आहे.

नुकत्याच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका पार पडल्या. आता या नवनिर्वाचित सदस्यांनी पदभार

> महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी विभागातील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी संगणक चालकांच्या संपामुळे तालुक्यातील लाभार्थ्यांचे कामे खोळंबली असुन तसेच सहा महिन्यांपासूनचे मस्टरचे पैसे अडकले आहेत. शासनाने तात्काळ अडकलेले मस्टरचे पैसे लाभार्थ्यांना अदा करुन विविध कामे मार्गी लावण्यात यावे.
> बसीर पटेल
> **सरपंच जामगाव.**
> **ता. गंगापुर,**

स्वीकारल्यानंतर किती दिवसांत कामे मार्गी लावणार हे आता पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शासनस्तरावरून पर्यायी व्यवस्था करुन लाभार्थ्यांची अडकलेले मस्टरचे पैसे व इतर कामे मार्गी लावण्याची मागणी लाभार्थी करत आहे.



## नशिबाची परिक्षा

**शुक्रवार दि . १३ फेब्रुवारी २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १८० २७० ९०० | ९-१ | १४० १२८ ११९ | जोड ९०-३१-२४-५७-१८ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १९० १४५ ११८ | ०-६ | १२३ १५० ११४ | जोड ०३-२६-४५-१९-६७ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २६० ३५० ११६ | ८-९ | १२६ १८० ११७ | जोड ८१-५९-७४-२०-९६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | | | |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

द•ख•ल

## देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर बीएसएनएल कर्मचाऱ्यांची निदर्शने



**अहिल्यानगर** : अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाने गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी पुकारलेल्या देशव्यापी संपात बीएसएनएल कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सक्रिय सहभाग नोंदविला. सरकारी, निमसरकारी कर्मचारी, विविध क्षेत्रांतील कामगार तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आयोजित या संपात बीएसएनएल कर्मचाऱ्यांनी काम बंद ठेवत अहिल्यानगर येथील बीएसएनएल कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. यावेळी बीएसएनएलला कमकुवत करू नका, ४ऋ सेवा तातडीने सुरू करा, ५ऋ अंमलबजावणी जलद करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. बीएसएनएल ही सार्वजनिक क्षेत्रातील महत्त्वाची दूरसंचार कंपनी असून तिला सक्षम करण्यासाठी शासनाने ठोस व तातडीची पावले उचलावीत, अशी मागणी आंदोलकांनी केली. आधुनिक तंत्रज्ञानाची वेळेत अंमलबजावणी केल्यासच बीएसएनएल स्पर्धात्मक राहू शकते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कर्मचाऱ्यांनी वेतन पुनर्रचना (वेतन रिविजन), पारदर्शक पदोन्नती धोरण लागू करणे, तसेच आउटसोर्सिंगची प्रक्रिया थांबवावी, यासाठीही आग्रह धरला.

## संदिप आल्हाट यांची विभागीय अध्यक्षपदी निवड



**श्रीगोंदा** : नाशिक विभागातील पदविकाधर पशुवैद्यक संवर्गासाठी ऊर्जेचा नवा अध्याय सुरू झाला आहे. ज्येष्ठ, अनुभवी आणि चळवळीतील स्वाभिमानी कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले धडाडीचे नेतृत्व संदिप भाऊसाहेब आल्हाट यांची महाराष्ट्र राज्य पदविकाधर पशुवैद्यक संघटना यांच्या विभागीय अध्यक्ष (नाशिक विभाग) या महत्त्वपूर्ण पदावर निवड करण्यात आली आहे.

श्रीगोंदा पंचायत समितीमध्ये पशुसंवर्धन विभागात कार्यरत असलेले संदिप भाऊसाहेब आल्हाट यांची महाराष्ट्र राज्य पदविकाधर पशुवैद्यक संघटना यांच्या विभागीय अध्यक्ष (नाशिक विभाग) या महत्त्वपूर्ण पदावर निवड करण्यात आली आहे.त्याच्या माध्यमातून संघटनात्मक बांधणी, तळागाळातील कार्यकर्त्यांशी घट्ट संवाद आणि प्रश्नांवर थेट भिडण्याची शैलीही आल्हाट यांची ओळख. काम बोलतं, माणूस नव्हे या तत्त्वावर विश्वास ठेवणारे नेतृत्व आता नाशिक विभागाच्या ध्येयधोरणांना नवी धार देणार, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.राज्य कार्यकारिणीने आल्हाट यांच्यावर विश्वास दाखवत त्यांच्याकडे विभागाची धुरा सोपवली आहे.

## दासनवमी उत्सवातून मूल्यांची पायाभरणी : रामदासी महाराज



**अहिल्यानगर** : श्री समर्थ रामदास स्वामी यांनी मनाचे श्लोक ही जगाला दिलेली अमूल्य भेट आहे. ग्रंथराज दासबोध हा विश्वाच्या संस्कृतीला दिशा देणारा ग्रंथ आहे. ज्या ज्या वेळी मानवी संस्कृती काही नकारात्मक गोष्टींमुळे अधःपतनाकडे जायला सुरुवात होईल त्या त्या वेळी श्री समर्थांचा एक- एक शब्द अखिल मानवाच्या विचारसरणीला तारणार आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक वयोगटासाठी श्री समर्थांचे समग्र साहित्य समर्पक व प्रेरणादायी आहे. गेल्या ५७ वर्षांपासून श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ दासनवमी उत्सवातून याच माणूस घडवणाऱ्या मूल्यांची सतत पायाभरणी करत आहे, असे प्रतिपादन अजेयबुवा रामदासी महाराज यांनी केले.

श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित दासनवमी उत्सव सांगता सोहळ्यामध्ये दासबोधाचे अंतरंग'' या विषयाचे विचारपुष्प गुंफताना भागवत कथाचार्य निरूपण व कथाकार अजेयबुवा रामदासी महाराज बोलत होते. दासनवमी उत्सव सोहळा समिती प्रमुख तथा मंडळाचे व्हाईस चेअरमन व श्री समर्थ प्रशाला-सांगळे गल्ली -प्राथमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी रामदासी महाराजांचे आगमनपर स्वागत केले.

### पावसाळ्यातील गाळ, वाढलेल्या फांद्या हटवण्यासाठी

# पाथर्डीत पालिकेची विशेष मोहीम; अपघाताचा धोका कमी होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : शहरातून जाणाऱ्या कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावर पावसाळ्यात साचलेली गाळयुक्त माती, तसेच सुशोभीकरणासाठी लावलेल्या झाडांच्या वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाढलेल्या फांद्या व पानगळीचा केरकचरा साफ करण्यासाठी पालिकेने विशेष मोहीम सुरू केली आहे. यामुळे अपघाताचा धोका कमी होऊन धुळीचा त्रासही कमी होणार असल्याने नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे. नाईक चौक ते आव्हाड महाविद्यालय, माणिकदौंडी चौक ते आरोग्य माता मंदिर, तसेच कोरडगाव रोडवरील आंबेडकर चौक परिसरात वाढलेल्या फांद्यांमुळे वाहतूक धोकादायक बनली होती.



या मार्गांवर प्रमुख शाळा-महाविद्यालये असल्याने विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे डिव्हायडरलगत वाढलेल्या झाडांच्या फांद्यांमुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना अपघातांना सामोरे जावे लागत होते.

> अबोल झाडांच्या फांद्या छाटून प्रवाशांचा अपघाताचा धोका टाळल्याबद्दल पालिका प्रशासन कौतुकास पात्र आहे. अशाच प्रकारे बोलक्या ठेकेदारांच्या 'फांद्या' छाटून विकासकामांतील अडथळे दूर केले, तर पालिका खऱ्या अर्थाने विकासाचे मंदिर ठरेल.

नगराध्यक्ष अभय आव्हाड व मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या सूचनेनुसार तातडीने मोहीम हाती घेण्यात आली आहे. राज्यात प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र मढी येथील चैतन्य कानिफनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर, तसेच मढी-वृद्धेश्वर-मायंबा-मोहटा देवीकडे जाणाऱ्या भाविकांची मोठी वाहतूक पाथर्डीतून होत असल्याने ही कारवाई अधिक महत्त्वाची ठरली आहे. फांद्या छाटल्यामुळे रस्ता दोन्ही बाजूंनी स्पष्ट दिसू लागल्याने अपघाताचा धोका कमी झाला आहे. डिव्हायडरलगत साचलेली सुमारे दोन फूट माती हटवून रस्त्याची रुंदी पूर्ववत करण्यात येत आहे.

ऊस गाळप हंगामातील अवजड वाहतुकीमुळे उडणारी धूळही यामुळे कमी होणार आहे. या मोहिमेत मुकादम राजेंद्र उदारे यांच्यासह शिवाजी बालवे, शिवाजी पवार व एकूण आठ कामगार सहभागी आहेत. कडक उन्हातही काम वेगाने सुरू असून, कामगारांच्या सुरक्षिततेसाठी रिफ्लेक्टर असलेले कपडे व कामाच्या ठिकाणी इशारा देण्यासाठी लाल झेंडे लावावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पाच जणांकडून झालेल्या बेदम मारहाणीत व्यवसायिकाचा मृत्यू



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : हॉटेलमधील काचेचे फर्निचर फोडल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून आरणगाव येथील एका व्यावसायिकाला पाच जणांनी मिळून बेदम मारहाण केली. या गंभीर मारहाणीत जखमी झालेल्या मिठु कार्तिक दत्त यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेली माहिती अशी की, कोमल फरसान मार्ट आणि हॉटेलचे मालक भाऊसाहेब विश्वनाथ नांगरे व जावेद छोटू आतार (दोघे रा. वाळकी) यांच्याशी मयत मिठु दत्त यांचा फर्निचरच्या नुकसानीवरून वाद झाला होता. याच वादाचा राग मनात धरून आरोपी भाऊसाहेब नांगरे, जावेद आतार आणि त्यांच्या हॉटेलमधील तीन कामगारांनी मिळून ६ मार्च २०२५ रोजी आरणगाव येथील 'अजय फॅब्रिकेशन' दुकानात घुसून दत्त यांना लाथाबुक्क्यांनी व शस्त्राने गंभीर मारहाण केली. या हल्ल्यानंतर जखमी दत्त यांना तातडीने उपचारासाठी पुणे येथील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, १७ दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर २३ मार्च रोजी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी केला असून, त्यांच्या फिर्यादीवरून पाचही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व इतर कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालयाचा शेतकरी मेळावा उत्साहात




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मांजरसुंबा : डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालय, विळद घाट यांच्या ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत मांजरसुंबा (ता. अहिल्यानगर) येथे भव्य शेतकरी मेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मांजरसुंबा ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. रुपालीताई कदम होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक प्रा. किरण दांगडे यांनी केले. या मेळाव्यात प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. एच. एल. शिरसाठ, कीटकशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका प्रा. जे. एस. राऊत तसेच कृषी सहाय्यक सुविधा वाणी (मांजरसुंबा व डोंगरगण) उपस्थित होत्या. डॉ. एच. एल. शिरसाठ यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पीक उत्पादन वाढीसाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन अत्यावश्यक असून निसर्ग संवर्धन करत जैविक शेतीकडे वळणे ही काळाची गरज आहे.

निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, गांडूळ खत व जीवामृत यांचा योग्य वापर करून सेंद्रिय शेतीचा प्रसार करावा, असे आवाहन त्यांनी केले. रासायनिक खतांचा अतिरेक टाळून आधुनिक तंत्रज्ञानाचा संतुलित वापर केल्यास उत्पादन वाढीसोबत जमिनीची सुपीकताही टिकवता येईल, असे त्यांनी नमूद केले. प्रा. जे. एस. राऊत यांनी मधुमक्षिका पालनाच्या माध्यमातून शाश्वत उत्पादन व पूरक उत्पन्न मिळवण्याचे महत्त्व विशद केले. मधुमक्षिका पालनामुळे परागीकरण वाढून पीक उत्पादनात लक्षणीय वाढ होते तसेच शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्थिर स्रोत उपलब्ध होतो, असे त्यांनी सांगितले. यावेळी उपसरपंच जालिंदर कदम, सोसायटीचे चेअरमन इंद्रभान कदम, डोंगरगण ग्रामपंचायतीच्या सरपंच वैशालीताई मते, संतोष पठारे, ग्रामविकास अधिकारी सारिका वाळुंज, प्रा. पुनम ठोंबरे यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रा. सुनिल कल्हापुरे (संचालक-तांत्रिक) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमेश्वर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

सूत्रसंचालन कृषिकन्या प्रगती देवकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषिकन्या वैष्णवी बनकर, वर्षा चव्हाण, प्रगती देवकर, अक्षदा फराटे, सिद्धी गाडे व प्रार्थना जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कत्तलीच्या उद्देशाने गोवंश वाहतूक करणारा टेम्पो पकडला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : बेनवडी (ता.कर्जत) शिवारात कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणाऱ्या गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली असून कर्जत पोलीस ठाण्यात राशीन येथील तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरच्या कारवाईत तब्बल १६ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवार दि ११ रोजी रात्री गुप्त बातमीदारांमार्फत एका विटकरी आयशर टेम्पोत कत्तल करण्याच्या उद्देशाने त्यांची चारापाण्याची व्यवस्था न करता, यातना व पिडा होईल अशा पध्दीतीने दाटीवाटीने भरुन दाव्याने बांधलेल्या स्थितीत वाहतूक होत असल्याची माहिती पेट्रोलिंग करताना पोलीस कर्मचारी राजेंद्र थोरात यांना माहिती मिळाली.



यावेळी राशीनकडुन कर्जतच्या दिशेने विटकरी रंगाचा टाटा आयशर कंपनीचा टेम्पो (एमएच१६ सीडी १९९०) हा दिसला. त्यास थांबण्याचा इशारा केला असता त्याने तात्काळ टेम्पो थांबवला. त्याच्याकडे विचारणा केली असता त्याने आपले नाव नवनाथ गोरख साळवे (राशीन ता.कर्जत) असे सांगत वाहनचालक असल्याचे सांगितले. टेम्पोची पाहणी करीत असताना त्यात मागील हौद्यात गोवंश जातीचे एकूण लहान-मोठे १९ जनावरे दिसली. यात कोणतीही चारा-पाणी व्यवस्था न करता दाटीवाटीने भरली असल्याचे निदर्शनास आले. सदरची जनावरे कोणाचे मालकीची आहेत ? तशीच ती कोठे चालवली असे विचारले असता वाहनचालक नवनाथ साळवे याने सदरची जनावरे राजु महेबुब कुरेशी आणि इरफान इस्माईल कुरेशी (कुरेशीगल्ली, राशिन) यांच्या मालकीची असुन ती कत्तलीसाठी चालविली असल्याचे सांगितले.

पोलीस कर्मचारी मनोज मुरकुटे यांच्या फिर्यादीवरून वरील तिन्ही इसमाविरुद्ध महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सन १९९५ चे सुधारीत २०१५ चे कलम ५ (अ) (ब), ९ सह प्राण्यांना निर्दयतेने वागविने प्रतिबंधक कायदा कलम ३,११ प्रमाणे कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## वाचन, लेखन आणि उपक्रमशीलतेतून खरा विद्यार्थी घडतो : इंद्रजीत भालेराव




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : आजच्या शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास अत्यंत महत्त्वाचा ठरत असून, वाचन, लेखन आणि उपक्रमशीलतेच्या माध्यमातूनच खऱ्या अर्थाने विद्यार्थी घडतो, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक इंद्रजीत भालेराव यांनी केले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'युवकांसाठी कौशल्य विकास' या विषयावरील तीन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. भालेराव म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी प्रभावी योजना आहे. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासासाठी योग्य व्यासपीठ मिळते.

एनएसएस शिबिरांमधील अनुभव, सामाजिक बांधिलकी आणि संघभावना यामुळे विचारशक्ती, अभिव्यक्ती व सृजनशीलतेचा विकास होतो. वाचन आणि एनएसएसच्या माध्यमातूनच आपण घडलो, असा स्वानुभव त्यांनी कथन केला. सातत्यपूर्ण वाचनाशिवाय लेखनकौशल्याचा विकास शक्य नसून वाचनामुळे विचार प्रगल्भ होतात व शब्दसंपदा वाढते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी आपल्या कवितेचे सादरीकरण केले. कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रो. डॉ. जयंत शेवतेकर उपस्थित होते. प्रत्येकामध्ये कौशल्य असते; मात्र अशा कार्यशाळांमधून त्याला योग्य दिशा मिळते, असे त्यांनी नमूद केले. कार्यशाळेच्या अध्यक्षा निर्मलाताई काटे यांनी समाजसेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात, असे सांगितले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी केले. यावेळी 'तृषार्त' या वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यशाळेत १०० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# शेकडो वर्षांचे वडाचे झाड तोडल्याने संताप

## विद्युत तारांसाठी झाडांवर कुरघोडी?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : तालुक्यातील घोटण गावाजवळ राज्य महामार्गालगत उभ्या असलेल्या शेकडो वर्षांच्या वडाच्या झाडांची अलीकडे तोडणी करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. विद्युत वाहक तारा टाकताना झाडे अडथळा ठरत असल्याने संबंधित यंत्रणेकडून ही तोडणी करण्यात आल्याची चर्चा असून, त्यामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. राज्यमार्गाच्या कडेला उभे असलेले हे भव्य वडाचे वृक्ष परिसराची शोभा वाढविणारे तसेच प्रवाशांना सावली देणारे होते.

मात्र अलीकडे वीजतारा ओढण्याच्या कामादरम्यान झाडांच्या फांद्या छाटण्याऐवजी थेट मोठ्या प्रमाणावर तोड करण्यात आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी झाडांचे बुंधेच कापलेले दिसून येत आहेत. एकीकडे शासनाकडून 'वृक्ष लागवड' मोहिमा राबवून मोठ्या प्रमाणावर झाडे लावली जातात मात्र ही केवळ औपचारिकता पूर्ण करण्यापुरतीच लावली गेली का, असा सवाल उपस्थित होत आहे. कारण अनेक ठिकाणी लागवडीनंतर झाडांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही झाडे वाढलेली दिसत असली तरी संगोपनाचा अभाव जाणवतो. अशा परिस्थितीत शेकडो वर्षांची नैसर्गिक संपत्ती असलेली वडाची झाडे केवळ वीजतारांसाठी तोडली जात असतील, तर ही मोठी शोकांतिका असल्याची भावना भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष संजय टाकळकर यांनी व्यक्त केली.

संबंधित विभागाने झाडतोडीसाठी आवश्यक परवाना घेतला होता का, वन विभागाची मंजुरी होती का, याबाबतही स्पष्टता नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच उर्वरित झाडांचे संरक्षण करावे, अशी मागणी पर्यावरणप्रेमी व नागरिकांकडून होत आहे.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि १ भावना महेन्द्र नरम, २ किरण नारायणजी ठक्कर, ३ साथना जितेंद्र चोथाणी, ४ राजेश नारायणजी ठक्कर, ५ वंदना रविंद्र जगधने, सर्व रा श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि अहिल्यानगर यांच्या मालकीची व कब्जेवहीवाटीची आहे. सदर मिळकत निजोखमी, बिनबोजाची, निर्वेध असुन त्यांना सदर मिळकत विकण्याचा संपुर्ण हक्क व अधिकार आहे व तसा भरवसा त्यांनी आमचे आशिलास दिलेला असुन त्यावर विसंबुन आमचे आशिलाने खरेदीखताचा व्यवहार निश्चित केलेला असुन त्यापोटी विसाराची रक्कम देखील चेक स्वरूपात अदा केलेली आहे. सबब परिशिष्ठात नमुद मिळकती बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत आमचेशी संपर्क करून कागदोपत्री पुराव्यानिशी आमची खात्री करून दयावी मात्र मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास आमचे आशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तकार चालणार नाही व ती आमचे आशिलावर देखील बंधनकारक राहणार नाही.

**परिशिष्ट** :-

**मिळकतीचे वर्णन** : डि. अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका श्रीरामपुर पैकी मौजे शिरसगांव शिवारातील व शिरसगांव ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत यांसी गट नंबर ४/२ पैकी, क्षेत्र हे ००-०५ आर, यांसी आकार रु ००-०५ पैसे प्रमाणे यांसी चतुः सिमा पुर्वेस कोरेगांव हरेगांव रस्ता, पश्चिमेस : हरेगांव रस्ता, दक्षिणेस : गट नंबर ४ पैकी, उत्तरेस : गट नंबर ४ पैकी २० फुट खाजगी रस्त, येणेप्रमाणे चतुः सिमांकीत मिळकतीचे ती मधील तदंगभुत वस्तु, झाड, झुडुप, दगड, माती, पाला-पाचोळा, रस्ता-पाणी मार्ग वगैरेचे सर्व हक्कासह काहीएक राखुन न ठेवता.

हि नोटीस दिली असे.
दिनांक १२/०२/२०२६

**खरेदी घेणा-या करीता व तर्फे**
**ॲड. सुशिल. अ. पांडे**
**ॲड. वैभव व्ही गुगळे**
**ॲड. तुषार बी. आदिक**
**(मो. ९८५०१८१२२०)**

दखल

## स्पर्धा परीक्षेत यश मिळवत कृषी अधिकारी पदावर निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर येथील अपूर्वा ज्ञानदेव चव्हाण हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) स्पर्धा परीक्षेत यश मिळवत कृषी अधिकारी पदावर निवड मिळवली आहे. तिच्या या यशामुळे शिरूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अपूर्वा या शैक्षणिक व सामाजिक वातावरणात वाढल्या. त्यांचे वडील ज्ञानदेव चव्हाण हे प्राथमिक शिक्षक असून आई वैशाली चव्हाण या तेजस्विनी फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा आहेत. कुटुंबातील शैक्षणिक व सेवाभावी परंपरेचा ठसा त्यांच्या जडणघडणीत उमटला आहे. तसेच त्यांचे मामा अनिल कटके हे पोलीस उपअधीक्षक पदावर कार्यरत आहेत.

लहानपणापासून प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न मनाशी बाळगलेल्या अपूर्वा यांनी त्या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केले. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी त्यांनी नियोजनबद्ध अभ्यास करत अनेक आव्हानांवर मात केली.

अपूर्वा हिला लहानपणापासून अधिकारी होण्याची जिद्द होती. रात्रंदिवस अभ्यास करून तिने हे स्वप्न साकार केले, असे आई वैशाली चव्हाण यांनी सांगितले.

अपूर्वा यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोलेगाव येथे झाले असून माध्यमिक शिक्षण विद्याधाम प्रशाला शिरूर येथे पूर्ण केले. त्यानंतर अपूर्वाने बी.टेक.चे शिक्षण अण्णासाहेब शिंदे ॲग्रीकल्चर इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेज, राहुरी येथून पूर्ण केले. सध्या त्या सहाय्यक सहकारी अधिकारी, पनवेल येथे कार्यरत आहेत.

अपूर्वाच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. परिश्रम, चिकाटी आणि कुटुंबीयांच्या पाठबळाच्या जोरावर यश मिळवता येते, याचे तिने उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

## करंदीच्या साबळे कुटुंबाकडून पद्मश्री रघुवीर खेडकरांचा सन्मान

**तळेगाव ढमढेरे :** करंदी (ता. शिरूर) येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या व नुकतेच कुटुंबातील मातेचे अवयव दान व देहदान करून समाजात आदर्श घडवणाऱ्या साबळे कुटुंबियांकडून पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सन्मान करण्यात आला आहे.



करंदी (ता. शिरुर) येथे पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सन्मान करताना साबळे कुटुंबीय व आदी.(छायाचित्र आकाश भोरडे)

करंदी (ता. शिरूर) येथील यात्रेनिमित्त पद्मश्री रघुवीर खेडकर तमाशा फडासह गावामध्ये आलेले असताना, पोलीस पाटील वंदना साबळे यांच्या कुटुंबीयांकडून पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सन्मान करण्यात आला, यावेळी पोलीस पाटील वंदना साबळे, सोसायटीचे माजी चेअरमन कोंडीबा साबळे, सामाजिक कार्यकर्ते महेश साबळे, माजी चेअरमन संभाजी कंद्रूप, हनुमंत पिंगळे, तेजल साबळे गायक गणेश महाडिक यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान महेश साबळे यांनी चार महिन्यांपूर्वी आपण आपल्या आईच्या इच्छेनुसार आईचे अवयव दान व देहदान केले असल्याचे पद्मश्री रघुवीर खेडकर यांना सांगितले यावेळी आपल्या कुटुंबाने केलेले कार्य समाजाला एक दिशा देणारे आणि निश्चित कौतुकास्पद असल्याचे सांगत पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी साबळे कुटुंबियांचे आभार मानले.

# मुख्यमंत्र्यांकडून पुणे जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा

### अतिरिक्त निधीची मागणी; २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्यावर चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुणे जिल्ह्याच्या वर्ष २०२६-२७ च्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रारूप आराखड्याचा आढावा घेतला. वर्षा निवासस्थान येथून दूरदृश्यप्रणालीद्वारे ही बैठक आयोजित करण्यात आली होती. शासनाने निश्चित केलेल्या आर्थिक मर्यादेपेक्षा अतिरिक्त निधी देण्याची मागणी यावेळी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून करण्यात आली.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, तसेच 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त कार्यालयातून उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, ज्ञानेश्वर कटके, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, हेमंत रासणे, पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते.

तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, पालक सचिव व्ही. राधा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार आणि पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी पुणे जिल्ह्याच्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचा व २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्याचा सविस्तर आढावा सादरीकरणाद्वारे मांडला. विविध विकासकामे, प्राधान्यक्रम आणि निधीची गरज यावर चर्चा करण्यात आली.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी अतिरिक्त निधीचा सकारात्मक विचार करावा, अशी मागणी यावेळी लोकप्रतिनिधींनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासंदर्भात सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने निर्णय घेतला जाईल, असे

## पुणे डीपीडीसी बैठकीत दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** विधानभवन येथे आयोजित पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार होत्या.

यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार अमित गोरखे, भीमराव तापकीर, राहुल कुल, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, हेमंत रासणे, सुनील शेळके, शंकर जगताप, महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. काही मान्यवर दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, अजित पवार हे सूक्ष्म अभ्यासातून भविष्याचा वेध घेणारे नेतृत्व होते. राज्याच्या प्रगतीत त्यांचे मोलाचे योगदान असून जिल्हा नियोजन समितीची बैठक वेळेत सुरू करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, अजित पवार यांच्या निधनाने राज्यासह पुणे जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे. पायाभूत विकासाच्या माध्यमातून जिल्ह्याची प्रगती साधण्याचा त्यांचा ध्यास होता. त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे त्यांनी आवाहन केले.

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांच्या विविध भूमिकांमधील कार्याचा उल्लेख करत, लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्यातील समन्वयातून अनेक विकासकामे मार्गी लागल्याचे सांगितले. त्यांच्या स्मरणार्थ लोकोपयोगी स्मारक उभारण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी कोल्हापूर येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट स्टेडियमला तसेच पुणे विधानभवनातील झुंबर सभागृहाला अजित पवार यांचे नाव देण्याची मागणी केली.

## बेकायदेशीर कत्तलखाने उध्वस्त करा : आमदाराच्या प्रशासनाला सूचना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर । प्रतिनिधी**

शहरातील बेकायदेशीर कत्तलखान्यांवर आता निर्णायक कारवाई होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. शहरात सुरू असलेल्या अवैध कत्तलखान्यांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही, असा ठाम इशारा देत आमदार अमोल खताळ यांनी शहर पोलीस प्रशासन व नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना तात्काळ कारवाईचे कडक आदेश दिले आहेत. येत्या चार ते पाच दिवसांत शहरातील सर्व बेकायदेशीर कत्तलखाने उध्वस्त करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. सध्या शहरातील विविध भागांत सुमारे २८ बेकायदेशीर कत्तलखाने सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या कत्तलखान्यांमुळे परिसरात अस्वच्छता पसरत असून दुर्गंधी, आरोग्याच्या तक्रारी तसेच पर्यावरणीय प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर आमदार. खताळ यांनी प्रशासनाला कोणतीही दिरंगाई न करता ठोस आणि कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. आ. खताळ म्हणाले, शहरातील बेकायदेशीर कत्तलखाने कायमस्वरूपी बंद व्हावेत, ही माझी सुरुवातीपासून ठाम भूमिका आहे. मी वारंवार अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित केला आहे. कारवाई झाल्यानंतर काही काळ शांतता दिसते, मात्र पुन्हा हे कत्तलखाने सुरू होत असल्याचे आढळते. त्यामुळे यावेळी तात्पुरती नव्हे, तर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. ते पुढे म्हणाले, मी आमदार झाल्यानंतर लगेचच बेकायदेशीर कत्तलखान्यांविरोधात कडक पावले उचलण्याचे आदेश दिले होते. त्या वेळी नगरपालिकेने पोलीस बंदोबस्तात कारवाई करून कत्तलखाने उध्वस्त केले होते. मात्र त्यानंतर पुन्हा काही ठिकाणी कत्तलखाने सुरू झाले. हे अजिबात सहन केले जाणार नाही. कत्तलखान्यांच्या प्रश्नावर अधिवेशनात सातत्याने ठाम भूमिका घेणारा मी एकमेव आमदार आहे. शहरातील बेकायदेशीर प्रकारांना थारा दिला जाणार नाही. नागरिकांच्या आरोग्याशी, कायदा-सुव्यवस्थेशी आणि स्वच्छतेशी कुठलीही तडजोड केली जाणार नाही. चार ते पाच दिवसांतच बेकायदेशीर सर्व कत्तलखाने उध्वस्त झालेले पाहवयास मिळणार असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले आहे.



**यापूर्वीच्या बेकायदेशीर कत्तलखान्यांमध्ये सहभागी झालेल्या आरोपींवर एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यासोबतच, बेकायदेशीर कत्तलखाने उध्वस्त करताना मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. यासंदर्भात मी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याशी सविस्तर चर्चा केली आहे. तसेच या बेकायदेशीर कत्तलखान्यांमुळे संगमनेर शहरावर लागलेला कलंक देखील पुसून काढण्याचा आमचा निर्धार आहे. स्थानिक नागरिकांना योग्य आणि सुरक्षित वातावरण मिळावे, हे आमचे प्रमुख ध्येय आहे आणि त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.**

**- अमोल खताळ (आमदार)**

## शिरूर तालुक्यातील बेट भागात चोरट्यांचा धुमाकूळ

### चार दिवसांत पाच रोहित्र फोडले : नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** - शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी पोलिस दूरक्षेत्राच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून शिरूरच्या बेट भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मलठण, कवठे येमाई आणि सविंदणे परिसरात चोरट्यांनी अवघ्या चार दिवसात पाच विद्युत रोहीत्र फोडून त्यातील तांब्याच्या तारांची चोरी करण्यात आली आहे. तर दुसरीकडे कालच कवठे येमाई येथे भरदिवसा बंद घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीसह रोख रक्कम लंपास करण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मलठण येथील अष्टविनायक महामार्गालगत कॅनॉल रोडवरील विद्युत रोहित्र शुक्रवारी (दि. ६) मध्यरात्री फोडण्यात आले. चोरट्यांनी रोहित्रातील ऑईल खाली सांडवून आतील तांब्याच्या तारांवर डल्ला मारला. याप्रकरणी महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ इंद्रजित दामोदर खरसाडे (रा. मलठण, ता. शिरूर) यांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या घटनेनंतर सोमवारी (दि. ९) मिडगुलवाडी येथील गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीवरील रोहित्र फोडण्यात आले. त्याच दिवशी सविंदणे येथील डोंगर भागात कान्हूर मेसाई रस्त्यालगत असलेले रोहित्र ही चोरट्यांनी लक्ष्य केले. दुसऱ्याच दिवशी कवठे येमाई च्या गणेशनगर परिसरातील वेल्डिंग केलेले रोहित्र फोडून त्यातील तांब्याच्या तारांची चोरी करण्यात आली.सतत घडणाऱ्या या चोरीच्या घटनांमुळे कवठे येमाई, सविंदणे व मलठण परिसरातील वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. वीज नसल्याने पिकांना पाणी देणे अडचणीचे बनले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. वीज नसल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान होत आहे. पोलिसांनी या घटनांचा तात्काळ छडा लावून तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.दरम्यान, कवठे येमाई (ता. शिरूर) येथे फत्तेश्वर मंदिराजवळील शरद सुनील गायकवाड यांच्या बंद घराचे भरदिवसा कुलूप तोडून चोरट्यांनी सुमारे साडे तीन तोळे सोने, चांदीचे दागिने व सुमारे साडे सहा हजार रुपये रोख रक्कम लंपास केली. बेट भागात होत असलेल्या सलग वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः रोहित्र चोरीमुळे शेती आणि पाणीपुरवठ्यावर थेट परिणाम होत . असल्याने ग्रामस्थांनी पोलिसांनी नियमित रात्रगस्त वाढवावी,संशयितांवर लक्ष ठेवावे आणि चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी जोरदार मागणी केली आहे.

## कोंढापुरीत कॅनलमध्ये पडलेल्या कोल्ह्याला जीवदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** कोंढापुरी (ता. शिरूर) येथे चासकमान कालव्याच्या कॅनलमध्ये पडून जखमी झालेल्या कोल्ह्याला जीवदान देण्यात नागरिक व प्राणीमित्रांना यश आले आहे.



कोंढापुरी (ता. शिरूर) येथील चासकमान कालव्याच्या कॅनलमध्ये एक कोल्हा निपचित पडून असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे व वनपरिमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांना मिळाली, त्यांनतर नियतक्षेत्र वनअधिकारी प्रमोद पाटील, निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व वन्यजीव बचाव पथकाचे शेरखान शेख, गणेश टिळेकर, वैभव निकाळजे यांनी सदर ठिकाणी धाव घेत ऋत्विक गायकवाड, गणेश गायकवाड व श्रावण गायकवाड यांच्या उपस्थितीत कोल्ह्याला ताब्यात घेतले, सदर कोल्ह्याची पशुवैद्यकीय अधिकारी गोविंद राठोड यांच्या उपस्थितीत तपासणी केली असता कोल्ह्याची प्रकृती खालावल्याचे निदर्शनास आल्याने कोल्ह्याला पुढील उपचारासाठी बावधन येथील प्राणी अनाथालयचे शंतनु लीमये व सागर सुतार यांच्या माध्यमातून बावधन येथील शासकीय प्राणी अनाथालय केंद्रात दाखल करण्यात आले असल्याने नागरिक व प्राणी मित्रांच्या सतर्कतेने कोल्ह्याला जीवदान मिळाले आहे.

## ज्येष्ठ पत्रकार प्रा. सुभाष शेटे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** - सामाजिक प्रश्नांची प्रामाणिक व निःस्वार्थ मांडणी करून त्यांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने प्रयत्न करणारे ज्येष्ठ पत्रकार प्रा. सुभाष शेटे यांना 'आदर्श पत्रकार पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

गेल्या वीस वर्षांपासून पत्रकारितेच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्न प्रभावीपणे मांडत समाजहितासाठी कार्य करणाऱ्या प्रा. शेटे यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. पुणे येथील आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत ज्योती नाळे यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा. शेटे हे प्रिंट, इलेक्ट्रॉनिक तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून सातत्याने लोकाभिमुख पत्रकारिता करत आहेत. पत्रकारितेसोबतच ते युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत पोलीस मित्र, ग्राहक संरक्षण, पत्रकार संरक्षण व माहिती अधिकार संघटनेचे महाराष्ट्र मीडिया प्रमुख व मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. तसेच राष्ट्रीय किसान विकास मंचचे महाराष्ट्र प्रदेश प्रमुख म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत.

या कार्यक्रमास पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, प्रतिनिधी व पत्रकार उपस्थित होते. प्रा. सुभाष शेटे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी आमदार पोपटराव गावडे, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे, पंचायत समिती सदस्या कांचन राजेश सांडभोर, चेअरमन अशोकराव गावडे तसेच पत्रकार मित्रपरिवार आणि युवा क्रांती संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा तक्रार समिती अध्यक्ष हभप नाना महाराज कापडणीस, महाराष्ट्र प्रदेश युवा अध्यक्ष शिवाजीराव शेलार, राष्ट्रीय संघटक डॉ. राजेश्वर हेंद्रे, अंकुशराव आगरकर, वर्षा नाईक, प्रतिभा महालकर, हर्षला मुलाणी आदींसह अनेक पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



# एक हजार ३२.८८ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मान्यता

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली डीपीडीसीची बैठक संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ साठी शासनाने प्रस्तावित केलेल्या १,०३२.८८ कोटी रुपयांच्या वित्तीय मर्यादेच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) बैठकीत मान्यता देण्यात आली. या आराखड्यात ग्रामीण व परिवहन विकास, अपारंपारिक ऊर्जा, हरीत महाराष्ट्र, नागरी व आरोग्य पायाभूत सुविधा, महिला व बालक सशक्तीकरण, गतिमान प्रशासन, कौशल्यपूर्ण रोजगारनिर्मिती, शैक्षणिक पायाभूत सुविधा तसेच क्रीडा व कलाविकास यांवर विशेष भर देण्यात आला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

विधानभवन येथील झुंबर हॉलमध्ये गुरुवारी (ता. १२) आयोजित बैठकीत त्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. बैठकीस कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार अमित गोरखे, भीमराव तापकीर, राहुल कुल, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, हेमंत रासणे, सुनील शेळके, शंकर जगताप, पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते.

तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, पालक सचिव व्ही. राधा, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख आणि पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. शासनाने १,०३२.८८ कोटी रुपयांची वित्तीय मर्यादा निश्चित केली असली, तरी विविध विभागांकडून तब्बल ३,१२८ कोटी रुपयांच्या मागण्या प्राप्त झाल्या आहेत. या मागण्यांची छाननी करून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक व प्राधान्यक्रमातील प्रकल्पांचा समावेश करण्यात येत आहे. तसेच ७०० कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी शासनाकडे करण्यात येणार असल्याचेही पवार यांनी सांगितले. मोठ्या व परिणामकारक प्रकल्पांवर भर : जिल्हा नियोजन समितीमार्फत लहान तुकड्यांतील कामांऐवजी अधिकाधिक नागरिकांना लाभ देणारे मोठे व परिणामकारक प्रकल्प राबवावेत, असे निर्देश देण्यात आले. अतिमागास व दुर्गम भागांच्या विकासाला प्राधान्य द्यावे. सर्व कामांसाठी प्रशासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी यासाठी ठराविक कालमर्यादा निश्चित करून त्याचे काटेकोर पालन करावे, असेही त्यांनी सांगितले. चालू योजनांचा आढावा : बैठकीत सन २०२५-२६ साठी मंजूर १,३७९ कोटी रुपयांच्या सर्वसाधारण योजनेसह एकूण १,५८९ कोटी ४६ लाख रुपयांच्या नियतव्ययाचा आढावा घेण्यात आला. यामध्ये सर्वसाधारण योजना - १,३७९ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजना - १४५ कोटी रुपये आणि आदिवासी घटक कार्यक्रम - ६५ कोटी ४६ लाख रुपये यांचा समावेश आहे. निधी वेळेत व नियोजनबद्ध पद्धतीने खर्च होईल याची दक्षता घ्यावी, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घालून दिलेल्या शिस्त, गुणवत्ता व कालमर्यादेच्या तत्त्वांनुसार प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी सर्वांची असल्याचे त्यांनी नमूद केले. येत्या एप्रिल महिन्यात प्रत्यक्ष उपस्थितीत सविस्तर आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी सादरीकरणाद्वारे सन २०२५-२६ मधील खर्चाचा आढावा मांडला. तसेच सन २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्यात कृषी विकास दर आणि दरडोई कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी पूरक क्षेत्रांच्या योजना, रास्त दर, निकोप स्पर्धा, खुली बाजारपेठ, जलसंधारण व मृदसंधारण कामे आणि भूगर्भ पाणीसाठा वाढीसाठी उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आल्याचे सांगितले.



विधानभवन येथे आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सन २०२५-२६ मधील जानेवारी २०२६ अखेरच्या खर्चाचा आढावा घेऊन सन २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्यास मान्यता देताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरुवारी (ता. १२) दूरदृश्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केले.

## आंबेगाव पंचायत समिती सभापतीपदाकडे सर्वांचे लक्ष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यात झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे निकाल सोमवारी (ता. ९) जाहीर झाले असून पंचायत समितीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने दहा पैकी आठ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. त्यामुळे पंचायत समितीवरील सत्ता राष्ट्रवादीकडे कायम राहिली असली तरी आता सभापतीपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार, याची उत्सुकता वाढली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून जारकरवाडी गणातून अंकिता वाळुंज, अवसरी बु. मधून निलेश टेमकर, पिंपळगाव तर्फे म्हाळुंगे मधून शिवाजी निघोट, कळंब मधून उषा कानडे, पेठ मधून संजय पवळे, घोडेगाव मधून कैलासबुवा काळे, शिनोली मधून ज्योती पारधी आणि बोरघर मधून संजय गवारी हे उमेदवार विजयी झाले आहेत. तर शरदचंद्र पवार गटाकडून पारगाव मधून श्वेता ढोबळे व चांडोली बु. मधून प्रियंका वाघ यांनी विजय मिळवला आहे.

सभापतीपदासाठी अनुभवी तसेच नव्या चेहऱ्यांची नावे चर्चेत आहेत. यापूर्वी संजय गवारी, कैलासबुवा काळे आणि उषा कानडे यांनी सभापती म्हणून काम पाहिले आहे. त्यामुळे पुन्हा अनुभवी सदस्यांना संधी दिली जाणार का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत.

दरम्यान, जारकरवाडी गणातून केवळ २२ व्या वर्षी निवडून आलेल्या अंकिता वाळुंज या सर्वात तरुण सदस्य ठरल्या आहेत. आंबेगावच्या पूर्व भागातील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी युवा नेतृत्वाला संधी देत त्यांची सभापतीपदी निवड करावी, अशी मागणी केली आहे. अंतिम निर्णय आमदार दिलीप वळसे पाटील व पक्षश्रेष्ठी घेणार असल्याने तालुक्याचे लक्ष त्या निर्णयाकडे लागले आहे.

## द•ख•ल

### ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात होणार विविध क्षेत्रातील प्रज्ञावंतांचा गौरव

**अहिल्यानगर** : छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे पाचव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रज्ञावंतांचा राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे. या प्रज्ञावंतांच्या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीज्ञ ड. भूषण बऱ्हाटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे संमेलन गुरुवार दि. १९ फेब्रुवारी रोजी गावातील परिवार मंगल कार्यालयात उत्साहात पार पडणार आहे. ग्रामीण भागातील साहित्य, संस्कृती, सामाजिक जाणिवा व नव्या विचारांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रज्ञावंतांचा राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार असल्याची माहिती डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे यांनी दिली.

### पंढरपुरात मिरजगावकरांचा भव्य अखंड हरिनाम सप्ताह

**मिरजगाव** : कर्जत तालुक्यातील मिरजगाव व परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भव्यदिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सालाबादप्रमाणे यंदाही हा सप्ताह गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ पासून गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत श्रद्धा व भक्तिभावात संपन्न होणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ३ ते ५ संगीत शिवमहापुराण कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायं. ७ ते ९ हरी कीर्तन व रात्री हरिजागर असा भक्तिमय कार्यक्रमांचा दिनक्रम असणार आहे. सप्ताह काळात भाविकांसाठी सकाळी अल्पोपहार, दुपारी व सायंकाळी पंगतीचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सांगता गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १२ काल्याच्या कीर्तनाने होणार असून ह.भ.प. मोहन महाराज बेलापूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.

### आ. तांबेंच्या निधीतून शाळा-महाविद्यालयांना पोडीयमचे वाटप

**शेवगाव** : शेवगाव शहरातील आबासाहेब काकडे विद्यालय येथे नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघाचे आ. सत्यजित तांबे यांच्या आमदार निधीतून विविध शाळा व महाविद्यालयांना पोडीयमचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे शैक्षणिक क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमात प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पोडीयमचे वितरण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापकांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, पोडीयमसारख्या तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर शाळेमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्यात शैक्षणिक गोडी निर्माण करण्यास तसेच अध्यापन अधिक प्रभावी व आकर्षक करण्यास निश्चितच सहाय्यभूत ठरेल.

या कार्यक्रमास शिक्षक संघटनेचे पदाधिकारी गोविंद वाणी, अशोक नवल, गणेश आमले, बालाजी गायकवाड, अशोक घुले, महेश जगदाळे, डॉ. शामसुंदर कौशिक, कानलाल जवरे, दामू गायकवाड, दसपुते, किशोर कापरे, अमोल दहिफळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### गुरुकुल इंग्लिश स्कूलमध्ये बाल आनंद मेळावा उत्साहात

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथील गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये सालाबाद प्रमाणे याही वर्षी बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या बाल आनंद मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास सहकार्य व व्यावहारिक ज्ञानात भर पडते या आनंद मेळाव्यात इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या वर्गातील १५० विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्टॉल या मेळाव्यात उभारून आपापला सहभाग नोंदविला. त्यामुळे विद्यालयाच्या परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. मेळाव्यासाठी परिसरात भव्य असा मंडप उभारण्यात आला होता. त्यातील विविध स्टॉल वरील खाद्यपदार्थ भाजीपाला, व्हेज ,नॉनव्हेज, बिर्याणी ,आईस्क्रीम पार्लर ,पाणीपुरी, पावभाजी ,भेळ अशी विविध प्रकारच्या स्टॉलची रेलचेल खाद्य प्रेमींनी या मेळाव्यात अनुभवली. विद्यार्थ्यांनी स्वतः बनविलेल्या विविध खाद्यपदार्थांची चव देखील उत्कृष्ट होती यावेळी पालकांनी विद्यार्थ्यांकडून भाजीपाला फळे खाद्यपदार्थ या मेळाव्यातून खरेदी करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

### अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, रिपाईचे तीव्र आंदोलन

**श्रीरामपूर** : श्रीरामपूरमधील एका शाळेतील वर्ग शिक्षकावर अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचाराचे गंभीर आरोप झाल्यानंतर शहरात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाई) च्या वतीने शहर पोलीस ठाण्यासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले. जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात आरोपी शिक्षकावर कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना निवेदन सादर करत प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. तसेच काही शिक्षक-शिक्षिका पालकांना गुन्हा दाखल करू नये, अशी धमकी देत असल्याचे आरोपही त्यांनी केले. अशा व्यक्तींनाही सहआरोपी करण्यात यावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

# देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## जोरदार घोषणाबाजी व निदर्शने; मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संपाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : देशातील ११ प्रधान संघटना व अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या आदेशानुसार गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरात सरकारी, निमसरकारी, शिक्षक व शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. कामगारविरोधी धोरणांचा निषेध करत व प्रलंबित मागण्यांकडे केंद्र व राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला. मागण्या मान्य न झाल्यास पुढील टप्प्यात बेमुदत संप व तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

नगरसंभाजीनगर रोडवरील सिंचन भवन येथून सकाळी ११ वाजता मोर्चास सुरुवात झाली. विविध शासकीय विभागांतील कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिला कर्मचाऱ्यांची उपस्थितीही लक्षणीय होती. चार कामगार संहिता रद्द करा, पीएफआरडीए कायदा रद्द करा, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करा, रिक्त पदे तत्काळ भरा, आठव्या वेतन आयोगाचा आढावा घ्या अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन करून जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा शाखेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, समन्वय समितीचे जिल्हा निमंत्रक रावसाहेब निमसे, हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले, आयटकचे ड. सुधीर टोकेकर, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, सुनील पंडित, महेबूब सय्यद, भाऊ शिंदे, मनपा कामगार संघटनेचे कॉ. आनंद वायकर, दीपक पापडेजा, कमलताई गिरी, डॉ. मुकुंद शिंदे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी झालेल्या भाषणांत केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांवर तीव्र टीका करण्यात आली. सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना जाहीर झाली असली तरी तिची नियमावली प्रसिद्ध न झाल्याने अनेक कर्मचाऱ्यांची पेन्शन प्रकरणे प्रलंबित असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. वेतनत्रुटी दूर करण्यासाठी खुल्लर समितीचा अहवाल तातडीने जाहीर करावा, खाजगीकरण व कंत्राटीकरणाला आळा घालावा, दहा वर्षांहून अधिक सेवा दिलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करावे, अशा प्रमुख मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.

तसेच कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे आदी एकूण १८ मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाला देण्यात आले. देशव्यापी संपाच्या अनुषंगाने राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षकांनी दोन तास धरणे सत्याग्रह करत शासनाचे लक्ष वेधले.

# हायमास्ट दिवे, स्ट्रिट लाईट्स चोरी

## प्रशासकीय काळात निधीचा गैरवापर : चाँद मणियार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : पाथर्डी नगरपरिषदेच्या मागील प्रशासकीय काळात हायमास्ट दिवे व स्ट्रीटलाईट बसविण्याच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, माजी नगरसेवक चाँद मणियार यांनी याबाबत गंभीर आरोप केले आहेत. विधानपरिषद आ. शिवाजी गर्जे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या या कामांतील निधीचा गैरवापर करत लाखोंची बिले काढण्यात आल्याचा संशय मणियार यांनी व्यक्त केला आहे.

शहरातील विविध भागांत हायमास्ट दिवे व स्ट्रीटलाईट बसविण्यात आल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी ही कामे अपूर्ण, निकृष्ट दर्जाची अथवा अस्तित्वातच नसल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष काम न करताच काम पूर्ण झाल्याचे दाखवून बिले मंजूर करण्यात आल्याचा आरोप मणियार यांनी केला आहे.

कामे अपूर्ण असतानाच त्रयस्थ खासगी कंपनीला तांत्रिक तपासणीसाठी पत्र देण्यात आल्याने कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा संशय अधिकच बळावला आहे. याशिवाय, विद्युत विभागाचा कोणताही प्रत्यक्ष अनुभव नसलेल्या संगणक अभियंत्याला विद्युत विभागाचा पदभार देण्यात आल्याने नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या प्रकरणात संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमत असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी माजी नगरसेवक चाँद मणियार यांनी केली आहे. आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे लवकरच लेखी तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. वेळेत कारवाई न झाल्यास जनआंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### ३७ लाखांचे दोन हायमास्ट दिवे गायब

शहरातील वीर सावरकर मैदान आणि भाजी बाजारतळ येथे सुमारे ३७ लाख रुपये खर्चून दोन मोठे हायमास्ट दिवे उभारण्यात आल्याचे अधिकृत कागदपत्रांत नमूद आहे. मात्र प्रत्यक्षात हे दिवे सध्या कुठेही दिसून येत नसल्याने, एवढ्या मोठ्या किमतीचे दिवे गेले कुठे? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.हे दिवे चोरीला गेले की केवळ कागदोपत्रीच उभारण्यात आले, असा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात असून, नगरपरिषद प्रशासनाने याबाबत तत्काळ खुलासा करावा, अशी मागणी होत आहे

## सिद्धेश्वर महाराजांचा महाशिवरात्रीनिमित्त यात्रा उत्सव



**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लिंपणगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांचा यात्रा उत्सव रविवारी १५ फेब्रुवारी रोजी प्रारंभ होत आहे. दरम्यान याच पंचक्रोशीतील लिंगाळेश्वर महाराजांचा यात्रा उत्सव मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. लिंपणगावच्या यात्रोत्सवानिमित्त यात्रा कमिटी कडून तीन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान यात्रेच्या पहिल्या दिवशी महाशिवरात्र असल्याने लिंपणगाव पंचक्रोशीतून सिद्धेश्वर महाराजांना पहाटेच कुटुंबांसमवेत महाभिषेक घालण्यात येतो. त्यानंतर रविवारी १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ९ ते रात्री ११.३० महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर जेष्ठ कीर्तनकार हरिभाऊ महाराज दिघे दिघोळ यांचे हरिकीर्तन होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सोमवारी १६ फेब्रुवारी रोजी सकाळपासून पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून श्री सिद्धेश्वर महाराजांना वाजत गाजत शेरनी वाटपाचा कार्यक्रम होणार आहे मंगळवार १७ फेब्रुवारी रोजी मंगला व नितीन कुमार बनसोडे यांचा लोकनाट्य कार्यक्रम होणार आहे आणि त्याच दिवशी साडेतीन ते सहा वाजेपर्यंत मल्लांसाठी जंगी आखाड्याचे देखील आयोजन करण्यात आले आहे.




# सिओ आनंद भंडारी यांच्याकडून मढेवडगावच्या विकास कामांची पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आनंद भंडारी यांनी आज काल भैरवनाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मढेवडगावला भेट दिली.

यावेळी मढेवडगाव जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेला मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंदजी भंडारी साहेब यांनी दिलेली भेट ही शाळेसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी मोठी प्रेरणादायी गोष्ट आहे. अशा भेटींमुळे शाळेच्या कामकाजाची दखल घेतली जाते, शिक्षकांचा उत्साह वाढतो आणि विद्यार्थ्यांनाही शिकण्याची नवीन उर्जा मिळते.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शाळेतील शैक्षणिक उपक्रम, स्वच्छता, शिस्त आणि सुविधा यांची पाहणी करून मार्गदर्शन केले, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे सरपंच आणि ग्रामसेवकांच्या उत्तम कामाचे तोंडभरून कौतुक केले, ही संपूर्ण गावासाठी अभिमानाची बाब आहे. गावाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे, पारदर्शकपणे आणि लोकहित डोळ्यासमोर ठेवून केलेल्या कामाची ही खरी पावती आहे.



मुख्य कार्यकारी आनंद भंडारी यांनी गावातील चांगल्या उपक्रमांबद्दल स्तुतीसुमने उधळली, म्हणजेच गावाने केलेल्या कामाची दखल थेट जिल्हा स्तरावर घेतली गेली आहे.

स्वच्छता, शिक्षण, पाणीपुरवठा, महिला बचत गट, पर्यावरण किंवा इतर विकासकामांमध्ये गावाने दाखवलेली एकजूट आणि नियोजनबद्ध कामगिरी खरोखरच कौतुकास्पद आहे. अशा प्रकारचे कौतुक हे केवळ शब्द नसतात, तर गावाच्या प्रगतीची अधिकृत पावती असते. यामुळे ग्रामपंचायत, सरपंच, सदस्य, ग्रामसेवक आणि सर्व ग्रामस्थ यांचा आत्मविश्वास नक्कीच वाढतो. यावेळी श्रीगोंदा पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी राणीताई फराटे , विस्तार अधिकारी हराळ, मढेवडगावचे कर्तव्यदक्ष ग्रामसेवक खाडे भाऊसाहेब, त्याचबरोबर मढेवडगावचे लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे, उपसरपंच राजकुमार उंडे, सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे ज्येष्ठ संचालक सुभाषकाका शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग सल्लागार सदस्य स्मितल वाबळे, मढेवडगावचे आरोग्य दूत डॉ. गवते ग्रामपंचायत सदस्य नवनाथ उंडे, योगेश मांडे, लालासाहेब गोरे, माजी उपसरपंच आणि विद्यमान सदस्य राहुल साळवे याबरोबरच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाळवणीत बिबट्या जेरबंद



**भाळवणी** : पारनेर तालुक्यातील भाळवणी शिवारातील नागबेंदवाडी परिसरात बुधवार दि. ११ रोजी वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला असून अजूनही दोन बिबटे या परिसरात वावरत असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याचे येथील नागरिकांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कळविल्यानंतर त्यांनी या बिबट्यला तताब्यात घेतले. गेल्या पंधरा दिवसांपासून विज वितरण कंपनीने लाईटच्या लोड शेडिंग मध्ये बदल करून रात्रीची लाईट शेतीसाठी दिल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. आठ दिवस रात्री दहा ते पहाटे सहा वाजेपर्यंत लाईटची वेळ अत्यंत चुकिच्या पद्धतीने सोडल्याने शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे. बिबट्यांचे प्रमाण अजूनही परिसरात असल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. किमान दिवसा काही काळ वीज पुरवठा करावा अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

# गौण खनिज माफियांचा ‘ओपन गेम’; प्रशासन झोपेत, तस्कर मात्र ‘ऑनलाइन’

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यात सध्या एक वेगळीच स्पर्धा सुरू आहे गावोगावी खनिजाची खुलेआम चोरी आणि त्याकडे प्रशासनाचा ‘नो सिग्नल’ मोड. दिवसाढवळ्या जेसीबींची घरघर, ट्रॅक्टर-डंपरची रांग, आणि रात्रीच्या अंधारात सुरू असलेला अवैध उत्खननाचा सिनेमा जोमात सुरु असून हे सगळं इतकं उघडपणे चालू आहे हे प्रशासनाला दिसत नाही का? असा प्रश्न अनेक गावकऱ्यांनाही पडला आहे

श्रीगोंदा तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात गौण खनिजाची खुलेआम तस्करी सुरु आहे स्थानिक पातळीवरून मिळालेल्या माहितीनुसार, अनेक गावांमध्ये माती,वाळू, मुरूम आणि इतर खनिजांचा विनापरवाना उपसा सुरू आहे.

महसूल आणि संबंधित विभागांकडे वारंवार तक्रारी दिल्या जात असल्या, तरी कारवाईला वेग कासवगतीनेच. परिणामी, तस्करांचे धाडस वाढले असून ते उघडपणे सांगतात प्रशासनाच्या आशीर्वादाने मस्त चाललंय आमचं! असेच चित्र तालुक्यात खुलेआम पाहण्यास मिळत आहे अनेक गावात तस्कर शोषलं मिडीयावर बोटीने काढलेली शुद्ध धुतलेली वाळू बांधकामासाठी घरपोहोच मिळेल तसेच घरभरणी रस्ता यासाठी मुरूम मिळेल तसेच माळरान वहिती करण्यासाठी काळी चिवट माती योग्य दरात पोहोच मिळेल अश्या अनेक पोस्ट चक्क शोषल मीडियावर टाकून अनेकजण खुलेआम धंदा करत आहेत त्यामध्ये अनेक कर्मचारी यांनी आपल्या नोकरीशी बेईमानी केल्यामुळे अश्या पोस्ट टाकून तालुक्यात खुलेआम तस्कर खुलेआम धंदा करत आहेत.

मात्र याबाबत महसूल प्रशासनाला कसलीच खबरबात नसल्याचे दाखविले जात असले तरीही नागरीकातून मोठ्या प्रमाणात आरोपाच्या फैरी उडवल्या जात आहेत गावकऱ्यांचा सूर स्पष्ट आहेकायदा सगळ्यांसाठी समान असेल, तर खनिज माफियांनाही तो लागू झाला पाहिजे.आता पाहायचे इतकेच की प्रशासन ‘ॲक्शन मोड’मध्ये येणार की खनिज तस्करांचा ‘मस्त चाललय’चा आत्मविश्वास असाच वाढत राहणार? श्रीगोंदा येथील जनतेची नजर आता अधिकाऱ्यांच्या पुढच्या पावलाकडे लागली आहे.



### पर्यावरणाची हानी, महसुलाला फटका

अनियंत्रित उत्खननामुळे शेतीची सुपीकता धोक्यात येत आहे, पाण्याची पातळी खालावत आहे आणि रस्त्यांची चाळण होत आहे. सरकारी महसुलालाही कोट्यवधींचा फटका बसत असल्याची चर्चा आहे. नियमांना हरताळ फासून सुरू असलेली ही लूट थांबवण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

### प्रश्नचिन्ह प्रशासनावर

* तक्रारी असूनही कारवाई का नाही?
* संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का?
* अवैध उत्खननाला राजकीय आश्रय आहे का?




दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार, दि.१३ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८




## साई परिक्रमेसाठी शिर्डी सजली

### रेकॉर्ड ब्रेक गर्दीची शक्यता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** दि. १३ फेब्रुवारी रोजी पहाटे साडेपाच वाजता सुरू होणाऱ्या या भव्य परिक्रम करिता संपूर्ण शिडी सज्ज झाली आहे. आता प्रतीक्षा आहे ती केवळ साईभक्तांच्या आगमनाची. दरम्यान ग्रीन एन क्लीन शिर्डी फाउंडेशनच्या संकल्पनेतून, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी नगर परिषद, शिर्डी पोलीस स्टेशन आणि समस्त ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नांतून हा भक्तिमय सोहळा आकार घेत आहे. प्रशासनानेही चोख नियोजन करत

तयारीला वेग दिला आहे. यंदा विक्रमी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व व्यवस्था काटेकोरपणे उभारण्यात आली आहे. यंदाच्या परिक्रमेचे मुख्य आकर्षण ठरणार आहे मध्य प्रदेशातील रतलाम येथून येणारी भव्य शोभायात्रा. सुवर्ण रथावर विराजमान होणारी श्री साईबाबांची प्रतिमा, छत्र-चामर, पवित्र चादर आणि ध्वजांच्या दिमाखदार मिरवणुकीमुळे वातावरण भक्तिमय होणार आहे. इंदूरचे तांडव नृत्य पथक, केरळमधील पारंपरिक वाद्य पथक आणि डमरू पथकांच्या गजरात परिक्रमा मार्ग दुमदुमणारआहे.

स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांची लेझीम व पावली पथके, संबळ पथक, विविध चित्ररथ आणि भजनी मंडळी भक्तीरस अधिक गहिरा करणार आहेत. संपूर्ण परिक्रमा मार्ग

फुलांनी सजवण्यात आला असून ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या आणि स्वागत कमानी उभारण्यात आल्या आहेत. शिर्डीकर ग्रामस्थ स्वतः रस्त्यावर उतरून साईराम च्या जयघोषात भाविकांचे स्वागत करणार आहेत. परिक्रमच्या दिवशी एकादशी असल्याने उपवास करणाऱ्या भाविकांची विशेष सोय करण्यात आली आहे. मार्गावर १०० हून अधिक ठिकाणी सामाजिक संस्था आणि ग्रामस्थांतफ साबुदाणा खिचडी, फळे, चहा नाश्ता तसेच पिण्याच्या पाण्याची मोफत व्यवस्था केली आहे.

भक्तांची सेवा म्हणजे साईंची सेवा या भावनेतून ही तयारी करण्यात आली आहे. गर्दीच्या नियोजनासाठी ग्रीन एन क्लीन फाउंडेशन व पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम उभारली आहे. तब्बल ५०० स्वयंसेवक परिक्रमा मार्गावर तैनात असणार आहेत. ठिकठिकाणी वॉच टॉवर्स उभारण्यात आले असून ड्रोन कॅमेऱ्यांच्या माध्यमातून आकाशातूनही नजर ठेवली जाणार आहे. सुरक्षा, शिस्त आणि सुविधा यांचा समतोल राखत परिक्रमा निर्विघ्न पार पाडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र फिरते शौचालय, प्रथमोपचार केंद्रे आणि

रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. परिक्रमा पूर्ण झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने भाविकांना प्रसाद आणि उदीचे वाटप करण्यात येणार आहे. मुख्य समारोप सोहळा 'शताब्दी मंडपात' पार पडणार असून भक्तीचा महासागर तेथे एकवटणार आहे. या सोहळ्यासाठी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील,डॉ. सुजय विखे पाटील, सरला बेटाचे मठाधिपती रामगिरीजी महाराज, महंत काशीकानंदजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. अप्पर जिल्हाधिकारी, नगर परिषद आणि पोलीस प्रशासनाचेही मोलाचे सहकार्य या आयोजनास लाभले आहे. साई भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रद्धा आणि सबुरीचा संदेश अधिक व्यापक करावा, असे

आवाहन ग्रीन एन क्लीन शिडी फाउंडेशनचे संयोजक, पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी केले आहे. १३ फेब्रुवारीच्या पहाटे साडेपाच वाजता जेव्हा साईनामाचा गजर दुमदुमेल, तेव्हा शिर्डीतील प्रत्येक रस्ता, प्रत्येक श्वास आणि प्रत्येक हृदय साईमय होईल आणि पुन्हा एकदा साईभक्ती हीच खरी परिक्रमा सिद्ध होणार आहे .

## विना हेल्मेट व राँग साईड वाहनचालकांवर कारवाई

### नगर-मनमाड महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी मोहीम



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** नगरमनमाड महामार्गावर सातत्याने घडणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी राहुरी पोलिसांनी विशेष कारवाई मोहीम राबविली. अपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांच्या सूचनेनुसार व पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या निर्देशानुसार गुरुवारी (दि. १२ फेब्रुवारी) हेल्मेट न वापरणाऱ्या ५१ दुचाकी चालकांवर तसेच राँग साईडने वाहन चालविणाऱ्या ३३ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ७३ हजार २५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

नगर-मनमाड महामार्गावर २०२४ मध्ये ५७ तर २०२५ मध्ये ५८ अपघात झाले असून, मागील दोन वर्षांत सुमारे ११५ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये बहुतांश मृत्यू हे दुचाकीस्वारांनी हेल्मेट न वापरल्यामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे. अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता पोलिसांनी कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ही मोहीम यापुढेही नियमितपणे राबविण्यात येणार असून, सर्व दुचाकी चालकांनी महामार्गावर प्रवास करताना हेल्मेटचा वापर करावा व वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे तसेच वाहतूक शाखेतील सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड, पोलीस हवालदार संतोष ठोंबरे, रमेश दरेकर, बापू फुलमाळी आदींनी केली.

### मध्यरात्री गोळीबारचा थरार, तरुण गंभीर

## निवडणूक वादातून हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या कोठला चौक परिसरात काल मध्यरात्री गोळीबाराची धक्कादायक घटना घडली. मुकुंदनगर येथील निवडणुकीच्या जुन्या वादातून हा हल्ला झाला असून, यात अब्रार मुख्तार शेख हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ फेब्रुवारी रोजी रात्री अकराच्या सुमारास फिर्यादी अब्रार शेख हा आपल्या मित्रासह दुचाकीवरून जुन्या बस स्थानक परिसरात गेला होता. यावेळी आरोपी जैद सय्यद उर्फ टायप्या, जाकीर सादिक सय्यद



उर्फ जाबू आणि एका अनोळखी इसमाने रिक्षामधून त्यांचा पाठलाग सुरू केला. आरोपींच्या हातात बंदूक पाहून फिर्यादीने राज चेंबरच्या दिशेने पळ काढला, मात्र आरोपींनी पाठलाग सोडला नाही. राज चेंबर जवळ आरोपी जैद सय्यद याने पिस्तुलातून चार गोळ्या झाडल्या. यातील एक गोळी अब्रारच्या कमरेला लागली आणि तो जागीच कोसळला.

घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने सूत्रे हलवून जाकीर सादिक सय्यद याला रिक्षासह (क्रमांक एम.एच. १६ सी.ई. ००२५) ताब्यात घेतले आहे. मुख्य आरोपी जैद सय्यद अद्याप फरार असून पोलीस सीसीटीव्हीच्या साहाय्याने त्याचा शोध घेत आहेत. जखमी तरुणावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. तोफखाना पोलीस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत

## बारावीचा पेपर देऊन बहिणीला घरी नेताना तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** बारावीचा पेपर देऊन मावस बहिणीला सुरक्षित घरी पोहोचवण्याच्या जबाबदारीने निघालेल्या तरुणावर नियतीने क्रूर प्रहार केला.

दुचाकीवरून बहिणीला घरी नेत असताना झालेल्या भीषण अपघातात समर्थ सोमनाथ लोखंडे (वय २१, रा. एरंडगाव समसुद, ता. शेवगाव) याचा जागीच मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेने एरंडगावसह संपूर्ण शेवगाव तालुका शोकसागरात बुडाला आहे. मंगळवारी (दि. १०) सकाळी बारावीच्या इंग्रजी विषयाचा पेपर असल्याने समर्थने मावस बहिण समृद्धी शिंदे व तिची मैत्रीण दिप्ती धस यांना दुचाकीवरून आबासाहेब काकडे विद्यालयात सोडून तो परत गेला. दुपारी पेपर संपल्यानंतर बहिणीला घेण्यासाठी तो पुन्हा विद्यालयात आला.

दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास तिघेही गावाकडे परतत असताना एरंडगाव भागवत परिसरात त्यांच्या दुचाकीची पुढे चाललेल्या ट्रॅक्टरला मागून जोरदार धडक बसली. अपघात इतका भीषण होता की समर्थचा जागीच मृत्यू झाला. बहिण समृद्धी शिंदे व तिची मैत्रीण दिप्ती धस या दोघी किरकोळ जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले समर्थ हा इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत होता. कुटुंबाचा आधार असलेला मुलगा अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने लोखंडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. समर्थच्या पश्चात आई-वडील पत्रकार सोमनाथ लोखंडे व एक भाऊ असा परिवार आहे. गावी अत्यंत शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त होत.

### राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाची कारवाई

## लाखोंची गोवा बनावटीची दारू जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**श्रीगोंदा :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने निमगाव खलू टोल नाक्यावर धडक कारवाई करत गोव्यातून बनावट लेबल लावून आणण्यात आलेली लाखो रुपयांची दारू जप्त केली. या कारवाईमुळे दारू तस्करांचे धाबे दणाणले असून जिल्ह्यातील अवैध मद्यविक्री साखळीवर मोठा आघात बसला आहे.

गुप्त माहितीच्या आधारे पथकाने टोल नाक्यावर संशयित वाहन अडवून तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात गोवा बनावटीची दारू आढळून आली. वाहनातील माल जप्त करण्यात आला असून संबंधित चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी उत्पादन शुल्क कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्राथमिक अंदाजानुसार जप्त दारूची किंमत लाखोंमध्ये असल्याचे समजते.

ही दारू स्थानिक बाजारपेठेत कमी दरात विक्रीसाठी आणली जात असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. राज्याच्या महसुलाला चूना लावण्याचा हा प्रकार असून सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मागणी वाढल्याचा फायदा तस्कर घेत असल्याची चर्चा आहे.उत्पादन शुल्क विभागाने यापुढेही अशा अवैध वाहतुकीवर कठोर कारवाई सुरू ठेवणार असल्याचा इशारा दिला आहे.

दरम्यान, या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू असून मोठी साखळी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे कायदा झोपलेला नाही, फक्त योग्य क्षणाची वाट पाहतो, अशीच ही कारवाई असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

## आता 'जन गण मन'च्या आधी 'वंदे मातरम' गायन बंधनकारक,

**नवी दिल्ली :** देशभरात प्रत्येक सरकार कार्यक्रमात आता जन-गण-मन या राष्ट्रगीतापूर्वी, वंदे मातरम गायन बंधनकारक करण्याचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला आहे. प्रत्येक अधिकृत सरकारी कार्यक्रमांमध्ये वंदे मातरमच्या संपूर्ण सहा कडव्यांचं गायन किंवा वादन अनिवार्य करण्यात आलं आहे. याबद्दल गृह मंत्रालयानं १० पानांचा सविस्तर आदेश जाहीर करून हे सर्व नियम स्पष्ट केले आहेत. सरकारच्या या नव्या नियमावलीनुसार सर्व नागरिकांना राष्ट्रगीताप्रमाणेच वंदे मातरम् सुरू असेपर्यंत सावधान स्थितीत उभं राहणं बंधनकारक आहे. याशिवाय शाळांमध्येही दिवसाची सुरुवात सामूहिक 'वंदे मातरम' गायनाने करावी आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रगीत, राष्ट्रगान आणि राष्ट्रीय ध्वजाबद्दल आदराची भावना रुजवावी हा यामागता हेतू असल्याचं सांगण्यात येतं. यावरून आता सत्ताधारी खासदारांनी निर्णयाचं समर्थन केलंय. विरोधकांनी मात्र यावरून सवाल उपस्थित केले आहेत.

### वंदे मातरम् कुठे-कुठे अनिवार्य?

तिरंगा फडकावतानाच्या कार्यक्रमांमध्ये, राष्ट्रपतींच्या औपचारिक आगमन-निर्गमनावेळी, राज्यपाल/लेफ्टनंट गव्हर्नर यांच्या राज्यस्तरीय कार्यक्रमात, नागरी सन्मान कार्यक्रमात, राष्ट्रपती राष्ट्राला संबोधित करताना (आकाशवाणी आणि दूरदर्शनवर), परेडमध्ये राष्ट्रीय ध्वज आणताना.

## थकबाकीचा फटका : खोकर सोसायटीचे चार संचालक अपात्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यांतील खोकर विविध कार्यकारी सोसायटीचे चार संचालक थकबाकीदार असल्याच्या कारणावरून त्यांना अपात्र ठरविण्यात आले असल्याचे आदेश श्रीरामपूरचे सहाय्यक निबंधक रवी गडेकर यांनी काढल्याने सहकारी सोसायटी संचालक मंडळात खळबळ उडाली आहे.

खोकर विविध कार्यकारी सोसायटीत गेल्या सन २०२२ मध्ये संचालक मंडळाच्या निवडणुकीत विद्यमान सत्ताधारी ज्ञानेश्वर काळे यांचे आठ संचालक तर पोपटराव जाधव यांचे पाच संचालक विजयी होवून येथे सत्तांतर झाले. खोकर येथील सतीष अण्णासाहेब शेरकर यांनी १ सप्टेंबर २०२५ रोजी सहाय्यक निबंधक कार्यालय श्रीरामपूर यांचेकडे खोकर विविध कार्यकारी सोसायटी संचालक मंडळातील पोपटराव बाबुराव जाधव, मथुराबाई बाळासाहेब चक्रनारायण, सुशिला मारूती गव्हाणे व प्रयागाबाई नानासाहेब भणगे या चार संचालकाविरूद्ध सहाय्यक निबंधक कार्यालयात सदरचे संचालक हे थकबाकीदार असल्याने ते संचालक पदावर राहण्यास अपात्र असल्याची तक्रार केली. यावर श्रीरामपूर येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात वेळोवेळी झालेल्या सुनावणी व युक्तीवादा दरम्यान तक्रारदार शेरकर यांचेवतीने मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील नारायण गुजाबा भोईर विरूद्ध यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी व रिटपिटीशन १३६६५/२०२४ चे विलास लिंबाजी वायळ विरूद्ध डिव्हीजनल जॉईंट रजिष्टार यांचे दाखले देत संबंधित संचालकांना अपात्र ठरविण्याची मागणी तक्रारदार यांचेवतीने वकील ॲड. उमेश लटमाळे यांनी केली. त्यात सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क, अनुसार व संस्थेचे पोट नियमाचे तरतुदीनुसार हे थकबाकीदार संचालक म्हणून राहण्यास अपात्र असल्याचा युक्तीवाद ड. लटमाळे यांनी केला.

त्यानुसार श्रीरामपूरचे सहाय्यक आदेशानुसार महाराष्ट्र सहकारी निबंधक रवी गडेकर यांचे संस्था अधिनियम १९६०चा कलम ७३ क अ अन्वये सदरील संचालक हे थकबाकीदार असल्याने ते संचालक म्हणून राहण्यास अपात्र आहेत. तसेच पोट कलम (२) नुसार पोटकलम (१) अन्वये उक्त संचालकांवर निरर्हता ओढवलेली असल्यामुळे ते संस्थेच्या संचालक मंडळात राहण्यास अपात्र आहेत. आदेशीत दिनांकापासून समितीच्या पुढील पाच वर्षाच्या मुदतीचा कालावधी समाप्त होईपर्यंत समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नेमणूक केली जाण्यास, पुन्हा नामनिर्दीष्ट होण्यास, पुन्हा स्विकृत किंवा पुन्हा निवडून येण्यास पात्र राह्वार नाही, असे आदेशात म्हटले आहे. त्यानुसार संबधित संचालकांना आता पुढील पाच वर्ष सहकारातील निवडणुका लढविता जाधव यांचेशी संपर्क साधला येणार नाही. याबाबत पोपटराव असता आम्हाला अद्याप आदेश मिळालेला नाही. आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेवू तसेच येथे फक्त आम्हीच थकबाकीदार नाहीत, ४००च्या दरम्यान शेतकरी थकबाकीदार आहेत. हिच परिस्थिती सर्वत्र आहे, असे त्यांनी सांगितले. येथे १३ संचालकांचे सदस्य मंडळ आहे, परंतू सहाय्यक निबंधकांच्या या निर्णयामुळे येथे आता संचालक संख्या नऊ वर आली आहे. शिवाय अपात्र ठरलेले सर्व संचालक पोपटराव जाधव यांचे पॅनलचे असल्याने येथे आता जाधव यांच्या पॅनलचे केवळ एक संचालक पदावर आहे.

